
ऑगस्ट २०२५ । पृष्ठे : ५२

महाराष्ट्र

# आरोग्य पत्रिका

**अंगदान-जीवन संजीवनी अभियान**



# अवयवदान

## माणुसकीचा, सर्वोच्च सन्मान

# अंगदान-जीवन संजीवनी अभियान

## अवयवदान पंधरवडा

दि. ३ ते १५ ऑगस्ट २०२५

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्वत: पुढाकार घेत अर्ज भरून अवयवादानाची शपथ घेतली आणि अवयवदान पंधरवडा अभियानाचा शुभारंभ केला. राज्यातील जनतेने या अभियानामध्ये सहभागी होऊन अवयवदानाची शपथ घ्यावी, असे आवाहन आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांनी केले आहे. .



## स्वातंत्र्यदिनी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते कोल्हापूरमध्ये अवयव दात्यांचा सत्कार

कोल्हापूर - स्वातंत्र्य दिनानिमित्त राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मा. प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते कोल्हापूर जिल्ह्यातील 117 पैकी 52 उपस्थित अवयवदाते व त्यांच्या नातेवाईकांचा सत्कार करण्यात आला. समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी ओळखून एका उदात्त विचाराने अवयवदान करण्याचा महत्वपूर्ण आणि उदात्त निर्णय घेणाऱ्या अवयव दाते आणि त्यांच्या नातेवाईकांचा यावेळी सत्कार करण्यात आला. अवयवदानाच्या या उदात्त कार्याबद्दल कार्याबददल व त्यांच्या कुटुंबियांनी दर्शविलेल्या सामाजिक बांधिलकीचे आणि धाडसाचे आरोग्यमंत्री आबिटकर यांनी मनापासून कौतुक केले.



महाराष्ट्र
# आरोग्य पत्रिका

वर्ष : सत्ताविसावे | अंक : ८ | महिना : ऑगस्ट २०२५




**'मरावे परी देह अन् अवयवरूपी उरावे'**
**जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रशांत वाडीकर अवयवदानामुळे आठ लोकांना नवीन जीवन मिळू शकते**


मुख्य संपादक/प्रकाशक
**डॉ. कैलास बाविस्कर**
उपसंचालक, आरोग्य सेवा (आय.ई.सी.)

सह संपादक
**डॉ. संजयकुमार जठार**
सहायक संचालक, आरोग्य सेवा (आय.ई.सी.)

संपादन सहाय्य
**श्री. प्रशांत तुपकरी**
जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी

**श्री. महादेव गिरी**
प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा

**e-आवृत्ती**
राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग
'परिवर्तन, आरोग्य भवन,
विश्रांतवाडी पोलिस स्टेशन समोर,
येरवडा, पुणे ४११ ००६

पत्रव्यवहारासाठी पत्ता
संपादक,
**राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग**
'परिवर्तन', आरोग्य भवन परिसर,
विश्रांतवाडी पोलीस स्टेशन समोर,
येरवडा, पुणे ४११ ००६.
दूरध्वनी : ०२०-२६६१०१७८,
२६६१०१७९.
फॅक्स : ०२०-२६६१०१८०
e-mail :
ddhsiec.creatives@gmail.com


## मोबाईल हेल्थ

राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे द्वारा प्रकाशित

- https://www.facebook.com/MahaArogyaIECBureau
- https://twitter.com/MahaHealthIEC
- https://www.instagram.com/mahahealthiec/
- http://bit.ly/MahaArogyaYT
- https://www.linkedin.com/company/maha-arogya-iec-bureau

संकेत स्थळ :
http://maha-arogya.gov.in
http://mahaarogyasamvadiec.in
maharogyasamvad

महाराष्ट्र
# आरोग्य पत्रिका

ऑगस्ट - २०२५

## अंतरंग



३७ आयुष्यमान भारत शालेय आरोग्य कार्यक्रम



४६ मरावे परी देह अन् अवयवरूपी उरावे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रशांत वाडीकर अवयवदानामुळे आठ लोकांना नवीन जीवन मिळू शकते



४८ रुग्णांना नवजीवन देण्यासाठी राज्यभरात 'अवयवदान' चळवळ म्हणून राबवा प्रकाश आबिटकर, आरोग्य मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण


- आयुक्तांचे मनोगत ... ५
- संचालकांचे मनोगत (मुंबई) ... ६
- संचालकांचे मनोगत (पुणे) ... ७
- संचालकांचे मनोगत (शहरी आरोग्य) ... ८
- संपादकीय ... ९
- अवयवदान व जनजागृती ... ११
- "मरावे परी, अवयवरूपी उरावे" ... १४
- कविता - मरावे परी, अवयवरुपी उरावे ... १६
- अवयव आणि ऊती दान ... १७
- अवयव आणि ऊती प्रत्यारोपण-नेहमी विचारले जाणारे प्रश्न ... २२
- जागतिक अवयवदान दिन ... २६
- अंगदान-जीवन संजीवनी अभियान अंतर्गत 'दोस्त मुंबई' ने राबवली विशेष मोहीम ... २८
- आईचे दूध - बाळाचा जन्मसिद्ध हक्क ! ... ३१
- स्तनपान सप्ताह (१ ते ७ ऑगस्ट) ... ३२
- स्तनपान जनजागृती सप्ताह ... ३३
- यशोगाथा -सिंदी रेल्वे प्राथमिक आरोग्य केंद्राची 'डबल' आनंदाची गाथा! ... ३५
- आयुष्यमान भारत शालेय आरोग्य कार्यक्रम ... ३७
- यशोगाथा:-आशा माऊली आणि तिच्या बाहुलीची कहाणी ... ३९
- कविता - अवयवदान ... ४०
- कविता - स्तनपान ... ४१
- कविता - स्तनपान सप्ताह २०२५ ... ४२
- कविता - आईचे दूध ... ४२

**वृत्त विशेष**

- अंगदान -जीवन संजीवनी अभियान अंतर्गत नांदेड येथे जनजागृती रॅली संपन्न ... ४३
- जागतिक स्तनपान सप्ताह निमित्त जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन ... ४४
- स्तनपानाबद्दल अर्थपूर्ण संदेश देणाऱ्या नक्षीदार रांगोळींचे औंध येथील आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्रात प्रदर्शन ... ४५
- अवयवदान चळवळीत महाराष्ट्र अग्रेसर एक लाखापेक्षा जास्त नागरिकांचा अवयवदानाचा संकल्प ... ४५
- मरावे परी देह अन् अवयवरुपी उरावे ... ४६
- अंगदान-जीवनदान संजीवनी अभियान' अंतर्गत आरोग्य शिक्षण व संपर्क विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घेतली अवयवदानाची शपथ ... ४७
- रुग्णांना नवजीवन देण्यासाठी राज्यभरात 'अवयवदान' चळवळ म्हणून राबवा ... ४८
- लेखकांना विनंती ... ४९
- अवयव दाते आणि त्यांच्या कुटुंबियांचा सत्कार ... ५०-५१

# आयुक्तांचे मनोगत



राज्यातील नागरिकांच्या आरोग्याचा स्तर उंचावण्याकरिता शासन सर्व स्तरावरून सदैव प्रयत्नशील आहे. राज्याच्या विकासात नागरिकांच्या आरोग्याला विशेष महत्त्व असते. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना आणि कार्यक्रमांमध्येही शासनाची आरोग्य सेवेत सामाजिक बांधीलकी आणि आरोग्य सेवांच्या गुणवत्तेत वाढ यावर भर देण्यात आलेला आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानातील योजनांची विभागामार्फत योजनाबध्द आणि परिणामकारक अंमलबजावणी होत आहे.

राज्यातील जनतेला सर्व प्रकारच्या आरोग्य सेवा देण्यास आरोग्य विभाग कटिबध्द आहे. केवळ विभागामार्फत करण्यात येणारे प्रयत्न त्याला पुरेसे पडणार नसून आरोग्य विषयक कार्यक्रमात जास्तीत जास्त लोकांचा सहभाग वाढविणे गरजेचे आहे. लोकांना आरोग्य सेवा पुरवितांना त्या गावपातळीपर्यंत पोहचविणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात अद्यापही आरोग्य सेवेचा लाभ घेण्याबाबत उदासीनता आढळते. आरोग्य सेवेबाबत लोकजागृतीचा अभाव असल्यामुळे आरोग्य विभागाच्या उपलब्ध सुविधांचा लाभ पुरेशा प्रमाणात घेतला जात नाही आणि ही उणीव दूर करण्याकरिता शासन स्तरावरून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. ऑगस्ट महिना हा प्रामुख्याने स्वातंत्र दिनाचे स्मरण करून देणारा महिना. १५ ऑगस्ट म्हणजे स्वातंत्र्यदिन! प्रत्येक भारतीयांच्या जीवनातील एक अविस्मरणीय दिन. देशाच्या पवित्र घटनेने आम्हांला हक्क दिले परंतु त्याबरोबर काही कर्तव्ये आपण जबाबदारीने पार पाडणे अपेक्षित आहे. राष्ट्र बलवान घडविण्यासाठी देशातील प्रत्येकजण बलवान म्हणजेच निरोगी असणे महत्त्वाचे आहे. निरोगी रहायचे असेल तर नियमित व्यायाम, संतुलित आहार या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. आपण स्वतंत्र असलो तरी प्रत्येकाने स्वयंशिस्त पाळणे तितकेच महत्त्वाचे आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मार्फत ऑगस्ट महिन्यात दि. १ ते ७ दरम्यान स्तनपान सप्ताह आणि दि. ३ ते १५ ऑगस्ट दरम्यान 'अवयवदान पंधरवडा' असे दोन प्रमुख अभियान राज्यात उत्साहात राबविले जाणार आहेत. या उपक्रमांसाठी व्यापक जनजागृती आणि समाजोभिमुख मोहीम राबवण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिलेले आहेत. स्तनपानाला बाळ आणि आईच्या आरोग्यामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. स्तनपान बाळाला आयुष्यभर अनेक आजारांपासून दूर ठेवते. तर अवयवदान ही एक वैयक्तिक कृती नसून, ती सामाजिक बांधिलकी आहे. अवयवदानासाठी लोकांमध्ये सकारात्मक मतपरिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रभावी जनजागृती अत्यावश्यक आहे.

धुम्रपान, मद्यपान, फास्ट फुडसारख्या अपायकारक पदार्थांचे सेवन, आरोग्याला घातक जीवनशैली याला आजची पिढी बळी पडत आहे. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आपण स्वयंशिस्तीचा धडा गिरविणे आवश्यक आहे. शारीरिक, मानसिक, आरोग्याबरोबर सामाजिक आरोग्य टिकविणे तितकेच महत्त्वाचे आहे.
बलशाली राष्ट्राचे स्वप्न साकार करण्यासाठी निरोगी मन आणि निरोगी विचारच उपयोगी ठरू शकतात.
धन्यवाद,
स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा!

**डॉ. कादंबरी बलकवडे**
आयुक्त, आरोग्य सेवा
तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान

# संचालकांचे मनोगत



प्रत्येक नवजात बाळासाठी सर्वोत्तम, नैसर्गिक व सुरक्षित आहार म्हणजे आईचे दूध. त्यातून मिळणाऱ्या पोषणतत्त्वांमुळे बाळाचे आरोग्य सुदृढ राहते, तसेच बाळाची रोगप्रतिकारक शक्ती वाढते. दरवर्षी १ ते ७ ऑगस्ट दरम्यान साजरा होणारा 'स्तनपान सप्ताह' हाच संदेश देतो - "स्तनपान बाळाचा हक्क, आईची जबाबदारी."

आरोग्य विभागाच्या वतीने राज्यभरात जिल्हा व तालुका स्तरावर विविध कार्यक्रम राबवले जातात - जनजागृतीसाठी रॅली, माता सल्ला केंद्रे, प्रसूतीपूर्व व पश्चात मार्गदर्शन सत्रे या माध्यमातून मातांना आणि कुटुंबातील सदस्यांना स्तनपानाचे महत्त्व, योग्य तंत्र, काळजी याबाबत माहिती दिली जाते आणि जनजागृती केली जाते. त्यासाठी समाज माध्यमांचा वापरही केला जातो. स्तनपान हे केवळ पोषणासाठीच नव्हे तर नवजात बाळाच्या संपूर्ण विकासाची सुरुवात आहे. आयुष्यभरासाठी ते बाळाला विविध आजारांपासून दूर ठेवते. स्तनपानामुळे केवळ बाळालाच नाही तर आईलाही फायदा होतो आणि अनेक आजारांपासून ती सुरक्षित राहते. स्तनपानाचे महत्त्व विशेषतः ग्रामीण व आदिवासी भागात पटवून देण्यासाठी सखोल मार्गदर्शन करण्याची गरज असते.

राज्य शासन व केंद्र शासनाच्या विविध योजनांद्वारे आणि कार्यक्रमांद्वारे स्तनपानाचे महत्त्व नागरिकांना आणि मातांना समजावून सांगितले जाते. जननी शिशु सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृवंदना योजना, पोषण अभियान आदींच्या माध्यमातून माता-बालक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी आरोग्य विभाग सातत्याने प्रयत्नशील आहे. या स्तनपान सप्ताहामध्ये सर्वांनी मिळून प्रत्येक बाळाला आईच्या दुधाचा अधिकार मिळवून देण्यासाठी काम करणे, हीच खरी आपली सर्वांची जबाबदारी आहे. कुटुंब, समाज आणि आरोग्य यंत्रणा यांच्या समन्वयातूनच निरोगी पिढी घडेल.

दरवर्षी जुलै-ऑगस्ट महिना हा आरोग्य विभागाच्या परीक्षेचाच महिना असतो. दुषित पाणी प्यायल्याने, दुषित अन्न सेवन केल्याने, अस्वच्छता यामुळे साथरोगांचा उद्भव होण्याचा धोका अधिक असतो. या कालावधीत संपूर्ण आरोग्य यंत्रणा साथरोग नियंत्रणात आणण्यासाठी धावपळ करीत असते. अशा आणीबाणीच्या वेळी आरोग्य विभागाचे डॉक्टर्स व कर्मचारी यांनी नेहमीच आपली तत्परता सिध्द केली आहे. दळणवळण साधने सध्या गतिमान झाली आहेत. प्रसिध्दी माध्यमे अत्यंत जागरुक झाली आहेत. समाज माध्यमांचा तर बोलबाला आहे. समाज अधिक संवेदनशील आणि प्रतिक्रियावादी झाला आहे. अशा परिस्थितीत आरोग्य विभागात काम करणाऱ्या प्रत्येक घटकाची जबाबदारी वाढली आहे. अपुरे मनुष्यबळ, प्रशासकीय अडचणी यासारखे अडथळे येतील मात्र प्रबळ इच्छाशक्ती व प्रामाणिक प्रयत्न याद्वारे निश्चितपणे त्यावर मात करता येते. यामुळेच आपण लोकांच्या विश्वासास पात्र ठरणार आहोत. आपली व आपल्या विभागाची प्रतिमा उंचविण्यासाठी प्रत्येकाने कटीबध्द होऊ या.

**डॉ. नितीन अंबाडेकर**
संचालक, मुंबई

# संचालकांचे मनोगत



"मरणानंतरही जीवनदान" हे अवयवदानामागील प्रेरणादायी तत्त्व आहे. दि. ३ ते १५ ऑगस्ट दरम्यान साजरा होणारा अंगदान-जीवदान संजीवनी अभियान अंतर्गत 'अवयवदान पंधरवडा' म्हणजे अवयवदानासाठी जनजागृतीचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. महाराष्ट्र गेल्या काही वर्षात अवयवदानात अग्रेसर आहे, तरी अजूनही समाजात संकोच, भीती, गैरसमज, अंधश्रध्दा आणि माहितीचा अभाव दिसतो. सामान्यतः मेंदूमृत (ब्रेनडेड) व्यक्तीच्या अवयवांद्वारे ८ ते ९ जणांचे प्राण वाचू शकतात. त्यासाठी वेळेवर व योग्य पध्दतीने प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक असते. राज्यातील नामांकित शासकीय व खासगी रुग्णालयांमध्ये अवयव संकलन केंद्रे कार्यरत असून, संबंधित वैद्यकीय अधिकारी आणि समुपदेशक यांना प्रशिक्षणही देण्यात येते. आपण सर्वांनी म्हणजेच डॉक्टर्स, आरोग्य कर्मचारी, समाजसेवक, सामान्य नागरिक यांनी एकत्र येऊन अवयवदानाची संवेदनशीलता व गरज समजून घेतली, तर भविष्यात हजारो रुग्णांना नवजीवन मिळू शकते.

साथीच्या आजारांपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी नागरिकांनी आवश्यक ती काळजी घेतली पाहिजे. दूषित पाण्याद्वारे पसरणाऱ्या रोगांची मोठी संख्या लक्षात घेता शुध्द व निर्जंतुक पाण्याचा वापर करणे आवश्यक आहे. साथीच्या आजारांचा सामना करण्यासाठी आरोग्य यंत्रणा तत्पर आहे. आजाराची लक्षणे दिसताच नागरिकांनी नजिकच्या सरकारी दवाखान्यात उपचार घ्यावेत. ऑगस्ट महिन्यात स्तनपान, अवयवदान पंधरवडा, जागतिक युवा दिन, राष्ट्रीय जंतनाशक दिन, नेत्रदान पंधरवडा साजरा होत आहे. युवक ही आज देशाची सर्वात मोठी शक्ती असून, युवकांनी आपले आयुष्य, निरोगी व सुदृढ राखण्यासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न करणे काळाची गरज आहे. वाईट व्यसने व संगत, चंगळवाद, नशेच्या पदार्थांचे सेवन, अनावश्यक साहस दाखवण्याच्या महत्त्वाकांक्षेमुळे आजचा तरुण व्यसनाधिनतेकडे अधिक झुकत असल्याचे समोर येत आहे. त्याचबरोबर सोशल मिडियाचा अनावश्यक व अतिरेकी वापरदेखील तरुणांना उद्दिष्टांपासून दूर करू पाहत आहे. या बाबींपासून परावृत्त होण्यासाठी युवकांनी आपल्या ध्येय व उद्दिष्टांकडे लक्ष केंद्रित करून त्या दिशेने वाटचाल करणे आवश्यक आहे. निरोगी युवकच स्वतःची व समाजाची प्रगती साधू शकतो.

माता व बालकांचे आयुष्य निरोगी राखण्यासाठी शासन स्तरावरून व्यापक प्रयत्न केले जात आहेत. अधिकाधिक प्रमाणात संस्थात्मक प्रसूतीचे आरोग्य विभागाचे उद्दिष्ट असून, त्या दृष्टीने आरोग्य यंत्रणा वाटचाल करत आहेत. निरोगी बाळासाठी स्तनपानासोबतच विविध लसी वेळच्या वेळी देणे आवश्यक आहे. या लसी देण्यामुळे धनुर्वात, घटसर्प, डांग्या खोकला, पोलिओ, क्षयरोग, गोवर, कावीळ यांसारखे आजार टाळता येतात. सार्वजनिक आरोग्य सेवेच्या माध्यमातून अधिकाधिक उत्तम व परिणामकारक आरोग्य सेवा गरिब व गरजू लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू या.

**डॉ. विजय कंदेवाड**
संचालक, पुणे

# संचालकांचे मनोगत



सार्वजनिक आरोग्य सेवेचा आवाका मोठा असून, विविध प्रयत्नांनंतरही अनेक आव्हाने समोर असतात. यासाठी शासन स्तरावरही वेळोवेळी धोरण आखले जाते. सामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून शासन नवनवीन योजना राबविते. समाजाच्या गरजानुसार आरोग्य सेवा देण्यावर विभागाचा भर असतो. आरोग्य सुधारण्यासाठीचा महत्त्वाचा अडसर म्हणजे आरोग्य प्रश्नाविषयी असणारे अज्ञान, गरिबी व आरोग्याविषयी असणारी अनास्था होय. केंद्र शासन व राज्य शासन यांच्या समन्वयाने क्षयरोग मुक्तीसाठी आर्थिक मदत, मातृत्व सेवांसाठी मदत अशा विविध योजना सुरू केल्या आहेत. त्याचा लाभ ग्रामीण व गरीब जनतेला होत आहे. अशा योजनांबद्दल जागरूकता निर्माण करणे हे आमचे सर्वांचे कर्तव्य आहे. जेणेकरून या योजनांचा लाभ समाजातील तळागाळातील गरजू लोकांना होईल.

समाजाचा सहभाग हा आरोग्य सेवेचा कणा आहे. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया, टीबी अशा अनेक रोगांवर नियंत्रण मिळविण्यासाठीचे आव्हान आपणा सर्वांसमोर आहे. परंतु समाजाचा सहभाग मिळाल्यास हे कार्य करणे सोईचे होते. त्यामुळे अशा आजारांना प्रतिबंध करण्यासाठी समाज सहभाग वाढविण्याची मोठी जबाबदारी आपणावर आहे. आव्हाने कठीण असली तरी ते आपले कर्तव्य आहे, कठोर परिश्रम, वचनबध्दता, प्रेरणा व सकारात्मक दृष्टिकोन याद्वारे चांगली आरोग्य सेवा देण्यासाठी व आपले ध्येय साध्य करण्यासाठी आपण सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदविण्याची गरज आहे आणि ते आपले सर्वांचे कर्तव्य आहे. सार्वजनिक आरोग्य सेवेतील प्रत्येक घटकाचा सहभाग महत्त्वाचा असून, परिपूर्ण आरोग्य सेवा देण्यासाठी आपण आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडून आरोग्य सेवा अधिक समाजाभिमुख करण्यासाठी आपले योगदान देण्याची गरज आहे.

आरोग्य विभागाच्या वतीने अनेक महत्त्वपूर्ण योजना राज्यभरात राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या शहरी आरोग्य अभिनयाच्या माध्यमातून आता नागरी भागांसाठीही आरोग्य सेवांची व्याप्ती वाढविण्यात आलेली आहे. गेल्या काही वर्षांपासून बाल मृत्यू, माता मृत्यू व अर्भक मृत्यू कमी करण्यासाठी विविध विभागांच्या समन्वयाने व्यापक प्रयत्न करण्यात येत आहेत. येत्या काळात आजारांचे समूळ उच्चाटन करण्याचा विभागाचा मानस आहे. सर्वांनी आपल्या आरोग्याची उचित काळजी घेऊन सण व उत्सव साजरे करावेत. आजाराची लक्षणे दिसताच जवळच्या सरकारी दवाखान्यात त्याची तपासणी करून घ्यावी. शासकीय आरोग्य संस्थांमध्ये आजारांवरील उपचारांची व आरोग्य योजनांची माहिती उपलब्ध असून, आपले व कुटुंबाचे आयुष्य निरोगी राखण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहावे.

**डॉ. स्वप्नील लाळे**
संचालक, शहरी आरोग्य

# संपादकीय

दि. ऑगस्ट ते ऑगस्ट हा 'अवयवदान पंधरवडा' म्हणून साजरा केला जातो. या उपक्रमामागचा उद्देश म्हणजे जनमानसामध्ये अवयवदानाविषयी योग्य माहिती, सकारात्मक दृष्टिकोन आणि ठाम निश्चय निर्माण करणे. एका अवयवदात्यामुळे अनेक जणांना नवे जीवन मिळू शकते. मेंदूमृत रुग्णाचे हृदय, यकृत, मूत्रपिंड, डोळे यांसारखे अनेक अवयव गरजू रुग्णांना जीवनदान देतात. हेच खरी माणुसकीची सेवा आहे. या मोहिमेला महाराष्ट्रातील जनतेने उत्तम प्रतिसाद देत एक लाख अवयवदान प्रतिज्ञापत्र भरून राज्याला देशात प्रथम क्रमांकावर नेले आहे. याचे सर्व श्रेय राज्यातील जनतेला नक्कीच जाते. आशा स्वयंसेविका यांचा या उपक्रमात अनमोल असा वाटा आहे.

येत्या काही दिवसांत आपण गणेशोत्सव साजरा करणार आहोत. गणपती बाप्पा हे "विघ्नहर्ता" मानले जातात. आज आपल्या समाजातील एक मोठं विघ्न म्हणजे जीवघेण्या आजारांमुळे होणारी निराशा आणि अवयव प्रत्यारोपणाची प्रतिक्षा. जर समाजातील प्रत्येकाने अवयवदानाचा संकल्प केला, तर अनेक कुटुंबांच्या जीवनातील हे विघ्न दूर होईल.

गणेशोत्सव हा आनंद, उत्साह, भक्ती आणि समाजजागृती यांचा संगम आहे. गेल्या काही वर्षांपासून गणेश मंडळांनी सामाजिक उपक्रमांमध्ये पुढाकार घेतला आहे. प्लास्टिकमुक्ती, रक्तदान, पर्यावरण संरक्षण अशा विविध संदेशांप्रमाणेच यावर्षी अवयवदानाबाबतची जागृती ही एक महत्वाची जबाबदारी ठरु शकते. "गणेशोत्सव मंडपात अवयवदानाचा संदेश" हा संकल्प आपल्या समाजाला नवा जीवदानाचा मार्ग दाखवेल.

अवयवदान हा मृत्यूनंतरही जगण्याचा, दुसऱ्याला जगवण्याचा आणि खऱ्या अर्थाने जीवनाचा उत्सव साजरा करण्याचा मार्ग आहे. बाप्पाला प्रसन्न करण्याचा उत्तम मार्ग म्हणजे इतरांना जीवनाची भेट देणे.

चला तर मग, या गणेशोत्सवात आपण सर्वांनी मिळून असा संकल्प करूया की

"गणपती बाप्पा मोरया... अवयवदान करुया !!"

**डॉ. कैलास बाविस्कर**
संपादक





# अवयवदान जीवनाचे महादान !

**आपणास माहीत आहे का? एक व्यक्ती आपल्या मृत्युनंतर 8 जणांचे आयुष्य वाचवू शकते.**

**आजच आपण अवयवदानाची प्रतिज्ञा करु या !**

## अवयवदानाच्या प्रतिज्ञेसाठी नोंदणी करण्याच्या 5 सोप्या पायऱ्या

- अवयवदानाची नोंदणी करण्याकरिता वेबसाईट https://notto.abdm.gov.in/pledge registry/ वर जा आणि Registered for pledge या बटनावर क्लिक करा.
- आधार किंवा आभा लिंक केलेल्या मोबाईल नंबरचा उपयोग करुन स्वत:चे प्रमाणीकरण करा.
- अवयव अथवा उती दान करण्याकरिता फॉर्ममध्ये आवश्यक माहिती भरा आणि दान करण्याकरिता अवयव निवडा
- आधारचा उपयोग करुन ई-सही करा.
- आपले प्रतिज्ञा प्रमाणपत्र डाऊनलोड करा.

### पायरी 1

Ÿ https://notto.abdm.gov.in /pledge-registry/ वर जा.
Ÿ Registered for pledge या बटनावर क्लिक करा.

### पायरी 2

Ÿ आधारचा उपयोग करुन प्रमाणीकरण करा.
Ÿ आधार जोडलेल्या मोबाईल क्रमांकावर प्राप्त झालेला OTP प्रविष्ट

### पायरी 3

Ÿ फॉर्म क्र. 7 मध्ये तपशील प्रविष्ट करा.

### पायरी 4

Ÿ आधारचा उपयोग करुन ई-

### पायरी 5

Ÿ प्रतिज्ञा पत्र (Pledge Certificate) डाऊनलोड करा.

# अवयवदान व जनजागृती

अवयवदानाबद्दल जनजागृतीचा अभाव भारतामध्ये मोठ्या प्रमाणात आढळतो. दरवर्षी देशामध्ये दोन लाख रुग्णांना मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रियेची अवशक्ता भासते. यापैकी फक्त आठ ते दहा हजार सुदैवी असतात कारण त्यांना मूत्रपिंड मिळते. इतरांना मृत्यूला सामोरे जावे लागते. अवयव प्रत्यारोपणासाठी अवयव मिळण्याचे मुख्य तिन स्त्रोत आहेत. 1) मृत्यू झाल्यावर, 2) जिवंतपणी, 3) ब्रेनडेड झाल्यावर. मृत झाल्यावर डोळे व त्वचा असे मोजकेच अवयव दान करता येतात मूत्रपिंड, लिव्हर, हृदय इत्यादी जीवनावश्यक अवयव दान करता येत नाहीत. जिवंतपणी आपल्या जवळच्या नातेवाईकास अवयव दान करण्यासाठी काही जण पुढे येतात पण हे भाग्य सर्वांच्याच नशिबात असते असे नाही. ब्रेन डेड रुग्ण हा निश्चितपणे काही तासानंतर मृत होतो. मृत्युनंतर त्याच्या अवयवाचा काही उपयोग नसतो. त्यामुळे ब्रेन डेड अवस्थेतच त्याचे अवयव काढल्यास त्याचा प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी वापर करून रुग्णांचे प्राण वाचवता येतात.

आपल्या देशामध्ये ब्रेन डेड रुग्णांचे दररोज हजारो अवयव आपण विविध कारणाने वाया घालवतो आहोत. याचा योग्य वापर केला तर त्याचा हजारो रुग्णांना फायदातर होईलच परंतु एका जिवंत नातेवाइकास विनाकारण मूत्रपिंड दान किंवा लिव्हर दानासारखा मोठ्या शस्त्रक्रियेला सामोरे जावे लागणार नाही. यासाठी पुढीलप्रमाणे काही उपयायोजना केल्यास त्याचा मोठा फायदा होईल.




**1) ब्रेन डेड रुग्ण शोधणे**

सदरचे रुग्ण हे बहुतांशी अतिदक्षता विभागात सापडतात. रस्तेअपघातात डोक्याला मार लागल्यावर रुग्ण ॲडमीत होतो यापैकी शोध घेतल्यास त्यामध्ये काही ब्रेन डेड अवस्थेत असतात. अतीदक्षता विभागात काम करणाऱ्या डॉक्टर, नर्सेस पॅरामेडीकल इत्यादी अधिकारी/कर्मचारी यांचे योग्य प्रशिक्षण केल्यास सदरचे ब्रेन डेड रुग्ण ओळखणे सोपे जाते. मानवी अवयव प्रत्यारोपण कायद्यामध्ये ब्रेन डेड रुग्ण कसा ओळखता याचे निकश दिलेले आहेत. या निकशाद्वारे एकादा रुग्ण ब्रेन डेड असू शकतो असे अनुमान काढून रुग्णालय प्रशासनास कळवणे अवश्यक असते. महाराष्ट्रामध्ये सार्वजनिक रुग्णालयामध्ये (शासकीय व महापालिका) अशा प्रकारे ब्रेन डेड रुग्ण ओळखण्याचे प्रमाण नगन्य आहे म्हणजेच ही रुग्णालये अवयव वाया घालवण्यामधे खासगी रुग्णालयाच्या खूप पुढे आहेत. तामिळनाडू व तेलंगणामध्ये मात्र याच्या उलट स्थिती पहावयास मिळते. यावर शासनाने ठोस उपाययोजना केली पाहिजे. अवयव वाया घालवणाऱ्या सार्वजनीक रुग्णालयातील संबंधिताकडून तामिळनाडूसारखी ब्रेन डेड रुग्णसंख्येची का अपेक्षा करू नये?

**2) ब्रेन डेड प्रमाणित करणे**

अतिदक्षता विभागात ब्रेन डेड रुग्ण दिसून आल्यावर कायद्यानुसार दुसरी पायरी म्हणजे ती तज्ञांच्या चमुने

(समितीने) सदरचा रुग्ण ब्रेन डेड आहे असे घोषित (प्रमाणित) केले पाहिजे. या समीतीचे 3 ते 4 सदस्य एका वेळेस एका ठिकाणी येणे किंवा त्याना आणणे ही एक कठीण गोष्ट आहे. ठरावीक विषयातील शासन मान्याप्राप्त डॉक्टरांनीच हे काम करावे असे बंधनकारक असल्यामुळे प्रमाणपत्रा अभावी अवयव काढता येत नाहीत व पर्यायाने ते वाया जातात.

### 3) नातेवाईकांचे समुपदेशन

सुदैवाने डॉक्टरांच्या समितीने रुग्ण हा ब्रेन डेड आहे असे प्रमाणित केले तर पुढची पायरी म्हणजे रुग्णांच्या नातेवाईकांशी संवाद साधणे यामध्ये ट्रान्सप्लांन्ट कोआर्डीनेटर किंवा समुपदेशक याचा महत्त्वाचा रोल आहे. नातेवाईकाना परिस्थिती समजावून सांगणे व अवयवदानासाठी त्यांची संमती मिळवणे हे अवघड कान त्याच्या संभाषण कुशलतेवर अवलंबून असते. योग्य समुपदेशानंतर काही नातेवाईक अवयव दानास तयार होतात. यानंतरच अवयव काढण्याच्या शस्त्रक्रिया सर्व कागदपत्राची पूर्तता झाल्यावर करण्यात येते व योग्य रुग्णावर त्याचे प्रत्यारोपण केले जाते. रुग्णांच्या नातेवाइकांचे योग्य पद्धतीने समुपदेशन न झाल्यास नातेवाईक अवयवदानास तयार होत नाहीत. यामुळे एक व दोन पायरीवर कष्ट घेवून यश मिळवले तरी तिसऱ्या पायरीवरील अपयशामुळे अवयवदान होत नाही.

### 4) प्रतीक्षा पत्र भरून घेणे

नातेवाईकानी अवयवदानास नकार दिल्यास अवयव वाया जातात. यावर उपाय म्हणजे जनजागृती करून नागरिकांकडून अवयवदानाचे फॉर्म भरून घेने. "दुर्दैवाने मला ब्रेन डेड स्थिती प्राप्त झाली तर माझे अवयव दान करण्यास मी संमती देत आहे". अशा प्रकारचे हे शपथपत्र/प्रतिज्ञापत्र आहे. ब्रेन डेड व्यक्तीने अशा प्रकारे शपथपत्र भरलेले (जिवंतपणी) आहे म्हणजेच ती त्याची "अंतिम इच्छा" आहे असे समजल्यावर सहजपणे नातेवाईकांवर एक भावनिक दबाव निर्माण होते व ते अवयव दानास तयार होतात. ब्रेन डेड स्थितीमध्ये अवयवदान न केल्यास थोड्याच वेळात हे अवयव स्मशाजात जातात.

### 5) प्रत्यारोपण समन्वयक व मानधन

साधारणपणे 2010 ते 2015 पर्यंत अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया ही अर्थीकदृष्ट्या खाजगी रुग्णालयांना मोठ्या फायदयाची होती. यात डॉक्टर व इतर पॅरामेडीकल कर्मचार्यांना चांगले मानधन दिले जात होते. महाराष्ट्रात अशी रुग्णालये 2005 मध्ये फक्त 25 होती. आज ती संख्या 150 झाली आहे व देशात 600 पेक्षा जास्त रुग्णालये या शस्त्रक्रियेसाठी मान्यताप्राप्त आहेत. या तीव्र स्पर्धेमुळे मानधनामध्ये वाढ झाली नाही. शासकीय रुग्णालयामध्ये प्रत्यारोपण समन्वयकाची पदे मंजुर नसल्यानुळे सामाजीक कार्यकर्ताकडूनच ही कामे करून घेण्यात येतात. खाजगी



रुग्णालयात ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेटरला पुरेसे मानधन मिळत नाही या कारणामुळे अवयव वाया जातात.

**6) ब्रेन डेड व पोलीस पंचनामा**

एखादा व्यक्ती अपघातामध्ये ब्रेन डेड झाला तर त्याची पोलीस केस होते. सदरच्या व्यक्तीचे अवयव काढून घेण्यासाठी पोलिसांच्या पंचनाम्याची व परवानगीची गरज असते. यासंबधिचे नियम (महाराष्ट्र पोलीस मॅन्युअल) हे अध्यापही 80 वर्षापुर्वीचे जुनेच असल्यामुळे पंचनाम्याबाबत दुमत निर्माण होते. या दिरंगाईमुळे पण अवयव वाया जातात. याबाबत वेळोवेळी स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांशी चर्चा करून, कार्यशाळा घेवून प्रशिक्षण देण्यात येवून मार्ग काढण्यात येतो.प्रशिक्षित पोलीस कर्मचारी बदली होवून गेले की पुन्हा अडचणी उदभवतात.

जगामध्ये पहिले मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रिया होवून आज 73 वर्ष झाली. भारतामध्ये पहिली सदरची शस्त्रक्रियेला आज जवळपास 55 वर्ष पुर्ण झाली आहेत तरीसुद्धा अवयव वाया जाण्याचे प्रमाण गंभीर आहे. अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यामध्ये भारत आज जगात तिसऱ्या क्रमकांवर आहे. सन 2013 च्या तुलनेत (5000 शस्त्रक्रिया) आज शस्त्रक्रियेची संख्या देशामध्ये तिप्पट वाढ (18000 शस्त्रक्रिया) झाली आहे. परंतु ब्रेन डेड व्यक्तीकडून अवयव मिळण्याच्या प्रमाणामध्ये वर नमूद 4 कारणामुळे विशेष वाढ झाली नाही. साधारणपणे 2020 पर्यंत महाराष्ट्र हा देशात ब्रेन डेड अवयवदानामध्ये प्रथम क्रमांकावर होता. केंद्र सरकार तर्फे राज्याच्या आरोग्य विभागास यासाठी बरीच वर्ष सन्मानपत्र मिळालेले आहे. त्यानंतर मात्र जनजागृतीमुळे तामिळनाडू, तेलंगाणा, कर्नाटक इत्यादी राज्ये महाराष्ट्राच्या खूप पुढे गेली आहेत. महाराष्ट्रामध्ये गेल्या वर्षी साधारणपणे 150 अवयव ब्रेन डेड व्यक्तीकडून प्राप्त केले तर तेलंगणाने 250 अवयव प्राप्त केले. वेळीच योग्य कार्यवाही न केल्यास केरळ व राजस्थान सारखे राज्य (लोकसंख्येने लहान) महाराष्ट्राच्या पुढे जातील व यात राज्य सरकारचे अपयश ठळकपणे निदर्शनास येईल.

सध्यस्थितीत भारतामध्ये दरवर्षी 1100 अवयव ब्रेन डेड व्यक्तीकडून मिळतात. सदरचे प्रमाण हे भारताच्या एकूण लोकसंखेच्या मानाने (0.65 अवयवदाता प्रती दसलक्ष लोकसंख्या) खूपच कमी आहे. हे प्रमाण स्पेनमध्ये जगात सर्वात जास्त (47 ब्रेन डेड व्यक्ती प्रती दशलक्ष लोकसंख्या) आहे. म्हणजेच ब्रेन डेड व्यक्तीकडून अवयव प्राप्त होण्याचे प्रमाण स्पेन मध्ये भारतापेक्षा 75 पटीने जास्त आहे. वरील सहा मुद्द्याबाबत उपाययोजना केल्यास (अतिदक्षता विभागातील) निश्चितपणे अवयव वाया जातात ते थांबवता येवून गरजूंना वापरता येतील व असंख्य रुग्णांचे प्राण वाचवता येतील.

**डॉ. प्रविण शिनगारे**
माजी वैद्यकीय शिक्षण संचालक,
वैद्यकीय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य



# “मरावे परी, अवयवरूपी उरावे”

राज्यात 3 ते 15 ऑगस्ट या कालावधीत 'अवयवदान पंधरवडा' साजरा करण्यात येत आहे. यासाठी राज्याच्या आरोग्य विभागामार्फत अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. माणूस आपल्याला मिळालेल्या अवयवांची विशेष काळजी घेत असतो. कान, नाक, डोळे, हात, पाय ही नीटनेटकी व व्यवस्थित असतील तर मनुष्य आयुष्यात कितीही मोठ्या संकटाला सामोरे जाऊ शकतो. त्यामुळे हे अवयव जपण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील असतो. मात्र समाजात आज एक किंवा अधिक अवयव नसणारे लोकदेखील मोठ्या प्रमाणावर आहेत हेदेखील विसरून चालणार नाही. त्यातूनच अवयवदानाची संकल्पना वैद्यकीय क्षेत्रात दृढ झाली.



आज अवयवदानाने अनेक लोकांना नवसंजीवनी मिळाल्याची अनेक उदाहरणे देता येतील. माणसाचे शरीर असंख्य अवयवांनी भरलेले आहे. जिवंतपणी माणूस या सर्व अवयवांचा पुरेपुर उपयोग करतो. मात्र आज जगात अनेक लोक असे आहेत जे विविध अवयवांच्या कमतरतेमुळे पिडामय जीवन जगत आहेत. अवयव निकामी झाल्याने दैनंदिन जिवन जगत असताना अनंत अडचणींचा सामना करावा लागतो. प्रसंगी मृत्यूदेखील ओढवतो. यावर उपाय म्हणून अवयव प्रत्यारोपण ही संकल्पना अस्तित्वात आली ज्यायोगे एका व्यक्तीचे अवयव दुसऱ्या गरजवंत व्यक्तीस दान करुन त्याला जीवनदान देणे शक्य होते. माणूस आपले अवयव निर्माण करू नाही मात्र हेच अवयव तो दान करू शकतो. मृत्यूला रोखण्याची ताकद या अवयवदानात आहे. असहाय लोकांना केलेले अवयवदान ही त्याना जिवनभराची अमूल्य अशी भेट ठरेल.

मानवाचा जीव लाखमोलाचा आहे. कायद्यानुसार मानवी अवयवांची विक्री करता येत नाही मात्र त्यांचे दान करता येते. अवयवदानानंतर मिळालेल्या अवयवाचे व्यवस्थित प्रत्यारोपण व्हावे व त्यादरम्यान कोणतेही गैरप्रकार घडू नयेत म्हणून शासनाने त्यासाठी अवयव प्रत्यारोपण कायदा अंमलात आणला आहे. सन 1994 साली 'मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा' आपल्या देशात अस्तित्वात आला व अवयव प्रत्यारोपणास कायदेशीरर मान्यता मिळाली. अवयवदान जिवंतपणी आणि मृत्यूनंतरदेखील करता येते. जिवंत असताना एक मूत्रपिंड (किडनी), यकृताचा (लिव्हरचा), आतड्याचा, स्वादुपिंड व फुपफुसाचा काही भाग आपल्या रक्ताच्या नातेवाईकांना सरकारची परवानगी काढून कायद्याने दान देता येतो. रक्ताच्या नातेवाईकांत सुधारीत कायद्यानुसार आई-वडील, भाऊ–बहिण, मुलगा–मुलगी, पती-पत्नी, आजी–आजोबा, नातवंडे यांचा समावेश होतो. माणसाच्या मृत्यूनंतर हृदय क्रिया बंद पडते व त्यानंतर सर्व अवयव दान करण्यासाठी निकामी होतात. केवळ नेत्र, त्वचा, अस्थी (हाडे) इत्यादी मरणानंतर 4 ते 5 तासांच्या कालावधीत दान करता येऊ शकतात. गंभीर जळालेल्या व्यक्तीचे प्राण त्वचेच्या दानाने

वाचवता येतात तर नेत्रदानाने अंध व्यक्तीस दृष्टी प्रदान करता येते.

जिवंतपणी अथवा मृत्यूनंतर अवयवदान प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची आर्थिक देवाणघेवाण कायद्याने प्रतिबंधित आहे. कायद्याचे उल्लंघन झाल्यास मोठी शिक्षादेखील होते. त्यामुळे अवयवदानाची संपूर्ण प्रक्रिया कायदेशिररित्या पार पाडावी लागते. सध्या आपल्या राज्यात किडणीच्या तसेच लिव्हरच्या प्रतिक्षेत अनेक लोक आहेत. काही रुग्ण हृदयप्रत्यारोपण व इतर महत्त्वाचे अवयव मिळण्याच्या प्रतिक्षेत आहेत. रक्तदान हे श्रेष्ठ दान समजले जाते पण अवयव दान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. मेल्यानंतरदेखील जगात जिवंत राहायचे असेल तर अवयवदानासारखे दुसरे पुण्य नाही. अवयवांच्या रूपात केलेले दान हे माणसाला मेल्यानंतरही जग दाखवू शकते व किर्तीमानदेखील बनवते. म्हणूनच 'मरावे परी अवयवरूपी उरावे' असेदेखील म्हणता येईल.

आपल्या शरीरातील विविध अवयवांच्या माध्यमातून अनेकांना जीवदान तर देता येतेच पण त्यांना जीवन जगण्याचे शारीरिक बळ देखील मिळते. एका घटनेत, दिल्लीच्या एका कुटुंबाने आपल्या मुलाच्या अपघाती मृत्यूनंतर भावनांवर नियंत्रण ठेवत मुलाचे अवयव दान करण्याचा निर्णय घेतला. दिल्लीच्या एम्स रुग्णालयात मृत पावलेल्या ह्या कुटुंबातील मुलाचे किडनी, यकृत यांसह एकूण 32 अवयव काढण्यात आले. त्यापैकी 3 अवयव तातडीने त्या अवयवांची गरज असलेल्या व्यक्तींना देऊन त्यांचे व्यंग कायमचे दूर करण्यात आले तर त्याच्या इतर अवयवांनी आणखी 30 जणांना नवसंजीवनी मिळणार आहे. आपल्या समाजात एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर दहन वा दफन विधींची परंपरा असून अवयवांशिवाय हे विधी अनिष्ट मानण्याची प्रथा आजही काही ठिकाणी मानली जाते. पण मृत्यूनंतर मानवासाठी निरूपयोगी ठरणारे हे अवयव अनेकांना जगण्याचे बळ व संजीवनी देऊ शकतात हि गोष्ट समाजमनात रुजवणे गरजेचे आहे. यासाठी सामाजिक संस्था, स्वयंसेवी संस्था, राजकीय पक्ष यांनी पुढाकार घेऊन ठिकठिकाणी अवयवदानाबद्दल लोकांच्या मनातील गैरसमज दूर करुन जनजागृती करण्याची आवश्यकता आहे.

दुसऱ्या एका घटनेत, सांगलीतील एका 55 वर्षीय महिलेला डॉक्टरांनी ब्रेन डेड घोषित केल्यानंतर तिच्या इच्छेनुसार तिच्या नातेवाईकांनी तातडीने तिचे अवयवदान करण्याचा निर्णय घेतला व त्यांच्या या निर्णयाने लगेचच पाच जणांच्या आयुष्यात नवी पालवी फुटली. या महिलेवर उपचारादरम्यान अशुद्ध रक्त शुद्ध करून मेंदूला रक्तपुरवठा करणारी यंत्रणा निकामी झाल्याचे डॉक्टरांच्या लक्षात आले. ही बाब डॉक्टरांनी नातेवाईकांच्या लक्षात आणून दिली. त्यानंतर लगेचच त्यांनी रुग्णाच्या इच्छेनुसार अवयवदानाचा निर्णय घेतला. अवयवदानासाठी त्यांच्या नातेवाईकांच्या पुढाकाराने पाच रुग्णांना जीवनदान देण्यात आले. त्यांचे दोन डोळे, दोन मूत्रपिंडे व यकृत यांचे पाच गरजू रुग्णांना पुण्यामध्ये रोपणही करण्यात आले. एका व्यक्तीने अवयवदान केले तर अनेकांना त्याचा लाभ मिळू शकतो ही बाब जनमानसात रुजवली पाहिजे.

एकेकाळी असणारा 'रक्तदान केल्याने शरीरातील रक्त कमी होते, अशक्तपणा येतो' हा समज कालांतराने लोकांच्या मनातून निघून गेला व रक्तदानाने निर्माण झालेली रक्ताची उणीव मानवी शरीरात अल्पावधीतच भरून निघते ही समज आल्यामुळे आज अनेक रक्तदाते पुढे येतात. त्याचप्रमाणे अवयवदानांबद्दल समाजात असलेले गैरसमज दूर झाले पाहिजेत व अवयव दानासाठी लोक स्वतःहून पुढे आले पाहिजेत. कारण आज विविध मानवी अवयवांची गरज असलेले व अनेक व्यंग असलेले रुग्ण अवयवांविना समाजात वावरू शकत नाहीत, गरज आहे ती त्यांना जगण्याचे शारीरिक बळ देण्याची. त्यामुळे जास्तीत जास्त लोकांनी अवयवदानाचा वसा लवकरात लवकर स्वीकारावा. अनेक गरजू रुग्ण विविध अवयवांच्या प्रतीक्षेत असून एका व्यक्तीच्या अवयवदानाच्या निर्णयाने अनेकांच्या जीवनात पालवी फुटू शकते. त्यामुळेच अवयवदान हे जीवनदानच आहे. माणसाचे अनेक अवयव मेल्यानंतरही इतरांच्या कामी येतात. त्यामुळे मेल्यावरही जिवंत राहायचे असेल तर श्रेष्ठ निर्णय नाही. 'मरावे परी अवयवरूपी उरावे' ही उक्ती म्हणूनच माणसाला दानाकडून कृतज्ञतेकडे घेऊन जाणारी आहे.

**वैभव मोहन पाटील**
कक्ष अधिकारी (अभियान संचालक कक्ष)
आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई

कविता

# || मरावे परी, अवयवरुपी उरावे ||

मना मानवा तू, मनाचे सुनावे ।
मरावे परी, अवयवरुपी उरावे ।।

जगी श्रेष्ठ दान, असे रक्तदान ।
परि सर्वश्रेष्ठ, अवयव दान ।।

दानाकडून जाऊ, कृतज्ञतेकडे ।
अवयवदानाने, मन समृध्दीकडे ।।

एक एक अवयव, मिळे गरजवंता ।
पीडा हरी मिळे, आशीर्वाद दाता ।

निकामी अवयव, त्यासी पुसावे ।
महत्व अवयवांचे, जनासी कळावे ।।

मानवी जीव असे, लाख लाख मोला ।
मिळे अवयवदाने, हर्ष पुनर्जन्माचा ।।

कायदा आला, अवयव प्रत्यारोपणाचा ।
कायधाने करा, संकल्प अवयवदानाचा ।।

जिवंत पणी असो की, मृत्यू अखेर ।
दान सख्ख्या नात्यांत, नको बाहेर ।।

लिव्हर, फुफ्फुस, स्वादुपिंड, मूत्रपिंड ।
जिवंतपणी होते या, अवयवांचे दान ।।

नेत्र, त्वचा अन, अस्थींचे दान ।
करा रे तुम्ही, मृत्यूनंतर दान ।।

रक्ताच्या नात्यातच, होते हे दान ।
आई-वडील, पती-पत्नी, भाऊ, बहीण ।।

व्यवहार नको ह्या, अवयव दानात ।
कायध्याने व्हाल, शिक्षेस पात्र ।।

असंख्य रुग्ण असती, दानाच्या प्रतीक्षेत ।
अवयवदानाने निर्मे, नवजीवन त्यांच्यात ।।

राहा मरणोत्तर, जिवंत जगतात ।
दान अवयवांचे, सदैव ऋणात ।।

चला जागृतीचा, वसा हाती घेऊ ।
गैरसमज दानाचे, चला दूर करू ।।

अवयवदान हेच खरे, जीवन दान ।
जीवनी नवपालवीचे, हेच वहान ।।

दात्याचे ऋण, कसे ते फेडावे ।
मरावे परी, अवयवरुपी उरावे ।।

**वैभव मोहन पाटील**
कक्ष अधिकारी (अभियान संचालक कक्ष)
आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई



# अवयव आणि ऊती दान

### अवयवदान

अवयवदान हे एक महान कार्य आहे, जे आपल्याला मृत्यूनंतर अनेकांचे जीवन वाचविण्याची संधी देते. अवयव हा शरीराचा एक भाग आहे जो एक विशिष्ट कार्य करतो, जसे की, हृदय, फुफ्फुसे, मूत्रपिंड, यकृत, स्वादुपिंड आणि आतडे इ. अनेक रुग्ण विविध अवयवांच्या शेवटच्या टप्प्यातील आजारांनी ग्रस्त असतात; अवयव दान हीच त्यांच्यासाठी एकमेव आशा आहे. दान केलेले अवयव या रुग्णांमध्ये उपचारात्मक हेतूने प्रत्यारोपित केले जातात.

### ऊतींचे दान

ऊती हा पेशींचा एक समूह आहे, जो मानवी शरीरात विशिष्ट कार्य करतो, उदाहरणार्थ कॉर्निया/डोळे, हाडे, त्वचा, हृदय झडप, रक्तवाहिन्या, नसा इ. विविध प्रकारच्या ऊतींचे प्रत्यारोपण केल्याने अनेक प्राप्तकर्त्यांच्या जीवनाची गुणवत्ता सुधारू शकते.




### अवयवदानाचे विविध प्रकार

**1. जिवंतपणी अवयवदान**

एखादी व्यक्ती, ज्याचे वय 18 वर्षांपेक्षा कमी नाही, त्याच्या आयुष्यादरम्यान, देशाच्या कायदेशीर चौकटीत उपचारात्मक हेतूंसाठी स्वच्छेने अवयव दान करू शकते. तो/ती आपल्या आयुष्यादरम्यान काही अवयव दान करू शकतो, जसे की, एक किडनी दान करू शकते (माणसाला एक किडनी सामान्य जीवन व्यतीत करण्यास सक्षम असते), यकृताचा (लिव्हर) एक भाग (प्राप्तकर्ता आणि दाता या दोघांमध्ये ठरावीक कालावधीनंतर यकृताच्या भागाचा पुन्हा विकास होतो) आणि एक स्वादुपिंडाचा भाग (स्वादुपिंडाचा अर्धा भाग त्याच्या कार्यासाठी पुरेसा आहे).

### जिवंतपणी अवयवदानाचे प्रकार

- जवळचा नातेवाईक दानकर्ता
- जवळच्या नातेवाईकांव्यतिरिक्त अन्य दानकर्ता
- विनिमय/स्वॅप दानकर्ता

**2. मरणोत्तर अवयव दान**

एखादी व्यक्ती, कोणत्याही वयात मृत्यू (मस्तिष्क मृत्यू/हृदय मृत्यू) नंतर आपले अवयव आणि ऊतींचे दान करून अनेक व्यक्तींना जीवनदान देऊ शकते. यासाठी मृत व्यक्तीच्या जवळच्या नातेवाईकांची संमती आवश्यक असते. मृत दात्याचे वय जर 18 वर्षांपेक्षा कमी असेल, तर त्याचे आई-वडील किंवा त्यांच्या द्वारा अधिकृत जवळच्या नातेवाईकांची संमती आवश्यक आहे. दान करण्यासाठी वैद्यकीय उपयुक्तता मृत्यूच्या दुर्दैवी घटनेच्या वेळी निश्चित केली जाते.

### जवळच्या नातेवाईकाव्यतिरिक्त किंवा मित्राकडून अवयव प्राप्त करणे शक्य आहे का?

मानवी अवयव प्रत्यारोपण कायद्यानुसार, जवळच्या नातेवाईकांशिवाय इतर कोणतीही जिवंत दानकर्ता व्यक्ती आपुलकी आणि आसक्तीच्या कारणास्तव किंवा इतर कोणत्याही विशेष कारणासाठी अवयव दान करू शकते. अशा प्रकरणांमध्ये प्रत्यारोपण होणाऱ्या रुग्णालयाच्या प्राधिकरण समितीची मान्यता घ्यावी लागते. जवळच्या नातेवाईकांच्या व्यतिरिक्त अन्य दानकर्त्यांकडून प्रत्यारोपणाद्वारे अवयव प्राप्त करण्यासाठी प्राधिकरण समितीची मान्यता अनिवार्य आहे.

जर अशा प्रकारची प्राधिकरण समिती हॉस्पिटलमध्ये अस्तित्वात नसेल, तर संबंधित जिल्हा किंवा राज्यस्तरीय प्राधिकरण समितीद्वारे मंजुरी घेतली जाऊ शकते.

### प्रत्यारोपण

प्रत्यारोपण म्हणजे शस्त्रक्रियेद्वारे एका व्यक्तीचा अवयव काढून तो दुसऱ्या व्यक्तीमध्ये कार्यान्वित करण्याची प्रक्रिया. जेव्हा प्राप्तकर्त्यांचा अवयव निकामी झाला असेल किंवा आजार किंवा दुखापतीमुळे तो खराब झाला असेल तेव्हा प्रत्यारोपणाची आवश्यकता असते.

### अवयव प्रत्यारोपणाने उपचार करता येणारे शेवटच्या टप्प्यातील रोग

| रोग | अवयव |
|---|---|
| हृदय विकार | हृदय |
| फुफ्फुसाचे आजार | फुफ्फुसे |
| मूत्रपिंड निकामी होणे | मूत्रपिंड |
| यकृत निकामी होणे | यकृत |
| मधुमेह | स्वादुपिंड |
| अंधत्व | डोळे |
| हृदय झाडपांचा रोग | हृदय झडप |
| गंभीर भाजणे | त्वचा |

### दान केलेले अवयव किती वेळात प्रत्यारोपण करावेत

मृतक व्यक्तीच्या निरोगी अवयवांचे शक्य तितक्या लवकर प्रत्यारोपण करणे आवश्यक असते. वेगवेगळे अवयव वेगवेगळ्या कालावधीत प्रत्यारोपण केले जाऊ शकतात.

| | |
|---|---|
| हृदय | 4-6 तास |
| फुफ्फुसे | 4-8 तास |
| छोटे आतडे | 6-10 तास |
| यकृत | 12-15 तास |
| स्वादुपिंड | 12-24 तास |
| मूत्रपिंड | 24-48 तास |

### मस्तिष्क स्तंभ मृत्यू (ब्रेन स्टेम डेथ)

ब्रेन स्टेम हा मेंदूचा एक महत्त्वाचा भाग आहे जो व्यक्तीला जिवंत ठेवतो. ब्रेन स्टेम डेड व्यक्ती एक बेशुद्ध रुग्ण आहे, जो स्वत: श्वास घेऊ शकत नाही. श्वास घेण्यासाठी तो व्हेंटिलेटरवर अवलंबून आहे, जरी एखाद्याची नाडी, रक्तदाब आणि जीवनाची इतर चिन्हे जाणवू शकत असली तरीही. मेंदूच्या स्टेमचे कार्य न करणे हे मृत्यूचे लक्षण आहे, मस्तिष्कला दुखापत झाल्यामुळे अशा प्रकारची स्थिती होते. अशा प्रकारच्या व्यक्तीला मस्तिष्क स्तंभ मृत (ब्रेन स्टेम डेथ) घोषित केले जाते.

कोमा रुग्ण आणि मस्तिष्क स्तंभ मृत रुग्णात फरक आहे. कोमाचे रुग्ण मृत नसतात तर मस्तिष्क स्तंभ मृत हा कोमाच्या पलीकडे अपरिवर्तनीय टप्पा आहे, कारण व्यक्ती पुन्हा चैतन्य मिळवू शकत नाही किंवा श्वास घेण्याची क्षमताही मिळवू शकत नाही. व्हेंटिलेटरमुळे हृदय काही तास ते काही दिवस कार्य करत राहू शकते आणि याच काळात जवळच्या नातेवाईकांची संमती घेतल्यानंतर अवयव दान करता येऊ शकते. **अवयवदान कधीही दात्याच्या जीवाची किंमत देऊन घेतले जात नाहीत.**

### ब्रेन स्टेम डेथची घोषणा

ब्रेन स्टेम डेथची घोषणा सरकारद्वारे मान्यता प्राप्त चार डॉक्टरांच्या ब्रेन स्टेम डेथ टीमद्वारे केली जाते, जे प्रत्यारोपण शस्त्रक्रियेत सहभागी नसतात. **तज्ज्ञांची ही टीम किमान 6 तासांच्या अंतराने दोनदा ब्रेन स्टेम डेथची चाचणी करून ब्रेन स्टेम डेथ निश्चित करते.** ब्रेन स्टेम डेडची घोषणा प्रत्यारोपणासाठी मान्यता प्राप्त रुग्णालयांमध्येच होऊ शकते. व्यक्तीला ब्रेन स्टेम डेड घोषित केल्यानंतरच जीवनदायी अवयव घेतले जाऊ शकतात.

### आवश्यक विनंती

मानवी जीवनाला वाचविण्यासाठी मृत्यूच्या दुर्दैवी घटनेनंतर (ब्रेन स्टेम डेथ/हृदयासंबंधी मृत्यू) अवयव आणि ऊतींचे जसे की, किडनी, लिव्हर,हृदय, डोळे, त्वचा आणि हाडे, इत्यादी दान करू शकता. मानवी अवयव प्रत्यारोपण कायद्यानुसार डॉक्टर / ट्रान्सप्लांट को-ऑर्डिनेटर / समुपदेशक जे कर्तव्याच्या ठिकाणी उपस्थित आहेत ते रुग्णांच्या नातेवाईकांना अवयव आणि उतींचे दान करण्यासाठी विनंती करतात. रुग्णांच्या नातेवाईकांना विनंती आहे की, त्यांनी या महान कार्यात सहकार्य करावे.

### अवयवदानासाठी प्रतिज्ञा घेण्याची प्रक्रिया

अधिकृत अवयव आणि ऊती दान फॉर्म (फॉर्म -7 THOA नुसार) भरून तुम्ही दाता बनू शकता. तुम्ही आमची वेबसाइट www.notto.nic.in वर साइन इन करून तुमचे अवयव दान करण्याचे वचन देऊ शकता आणि दाता म्हणून स्वतःची नोंदणी करू शकता किंवा ऑफलाईन नोंदणीसाठी आमच्या वेबसाइटवरून फॉर्म 7 डाउनलोड करून शपथ घेऊ शकता.

कृपया फॉर्म भरून त्याच्या एक प्रतीवर स्वाक्षरी करून नोटो च्या खाली नमूद केलेल्या पत्त्यावर पाठवा : नॅशनल ऑर्गन अँड टिश्यू ट्रान्सप्लांट ऑर्गनायझेशन, 4 था मजला, एनआयओपी भवन, सफदरजंग हॉस्पिटल कॅम्पस, नवी दिल्ली-110029

### तुमचा विचार बदलल्यास प्रतिज्ञा रद्द करा

जर तुमचा अवयव दान करण्याचा विचार बदलला तर, तुम्ही नोटो ची हेल्पलाईन (1800-11-4770) वर कॉल करून किंवा आम्हाला पत्र लिहून किंवा नोटो ची वेबसाइट www.notto.nic.in ला भेट देऊन प्रतिज्ञा रद्दचा पर्याय निवडून आपली प्रतिज्ञा रद्द करू शकता. याशिवाय, तुमच्या कुटुंबियांनाही अवयव दानाची प्रतिज्ञा रद्द केल्याबद्दल कळवू शकता.

### कायदेशीर चौकट

"मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा (THOA) 1994" अंतर्गत अवयव दान आणि प्रत्यारोपण समाविष्ट आहे, ज्याद्वारे जिवंत दाता आणि मृत दात्याला अवयव दान करण्याची परवानगी दिली आहे. 2011 मध्ये, कायद्यातील दुरुस्तीने मानवी ऊतींचे दान या कायद्यात समविष्ट केले आहे. त्यामुळे सुधारित कायद्याला "मानवी अवयव आणि ऊती प्रत्यारोपण कायदा 2011" असे संबोधले गेले.

हा कायदा उपचारात्मक हेतूंसाठी अवयव काढणे, साठवणे आणि प्रत्यारोपणाचे नियमन करतो आणि मानवी अवयवांच्या व्यावसायिक व्यवहाराला रोखतो. **कोणताही मानवी अवयव खरेदी किंवा विक्री करता येत नाही.**

### अवयवांची विक्री/ तस्करी होत असल्यास कुठे तक्रार करावी?

जर कोणी व्यक्ती खोटे रेकॉर्ड सादर करत असेल किंवा इतर कोणत्याही गुन्ह्यात दोषी आढळला असेल तर त्याची तक्रार प्राधिकारी, आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभाग, राज्य सरकारकडे केली पाहिजे. अशा परिस्थितीत कोणत्याही रुग्णालयाची प्राधिकरण समिती किंवा एखादी व्यक्तीही दोषी विरुद्ध गुन्हा दाखल करू शकतो.

### मानवी अवयव प्रत्यारोपण सुधारित कायदा 2011 के अनुसार गुन्हे/शिक्षा खालीलप्रमाणे आहेत

अनधिकृतपणे मानवी अवयव आणि उतींना काढून टाकण्यासाठी शिक्षा 10 वर्षांपर्यंत कारावास आणि रु. 5 लाख दंड किंवा दोन्हीही

मानवी अवयवांच्या व्यावसायिक व्यवहारासाठी शिक्षा 5-10 वर्षांपर्यंत कारावास आणि 20 लाख रु. ते 1 कोटी रु. दंड


### शरीर दान आणि अवयवदान

शरीर दान हे वैद्यकीय शिक्षण आणि संशोधनासाठी मृत्यूनंतर एखाद्याचे शरीर देण्याची कृती आहे, जी शरीरशास्त्र कायदा (Anotomy Act) 1949 अंतर्गत समाविष्ट आहे. देहदान केलेले मृत शरीर शरीरशास्त्रज्ञ, शरीरशास्त्र शिकवणारे वैद्यकीय शिक्षक आणि संशोधन करण्यासाठी एक प्रमुख शिक्षण साधन असते.

लोक त्यांच्या जीवन कालावधीत त्यांचे शरीर दान करण्याची प्रतिज्ञा करतात आणि त्यांची ही इच्छा त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना कळवतात.
तर, अवयव आणि उतींचे दान हे केवळ उपचारात्मक हेतूंसाठी असते, शिक्षण किंवा संशोधनाच्या हेतूंसाठी नाही. कुटुंबियांच्या संमतीने अवयव/ऊती मिळविल्यानंतर मृतदेह अंतिम संस्कारासाठी अत्यंत सन्मानाने त्यांच्या कुटुंबीयांना परत केला जातो.



**मातीचे शरीर,**
एक दिवस मातीत मिसळून जाईल,
**अवयव दान करून जा माणसा,**
जग तुझे गुणगान गायील.



### अवयवदान - रुग्णालयात की घरी?

अवयवदान तेव्हाच शक्य आहे जेव्हा रुग्णाचा मृत्यू आयसीयूमध्ये झालेला असतो आणि त्याला ब्रेन स्टेम डेड घोषित केले जाते. घरी मृत्यू झाल्यास कोणतेही महत्त्वाचे/जीवनदायी अवयव घेता येऊ शकत नाहीत. तथापि, जर व्यक्ती घरी मरण पावली डोळे (कॉर्निया) आणि त्वचा यांसारख्या ऊती विशिष्ट वेळेच्या कालावधीत दान करता येऊ शकतात.

### अवयवदानानंतर विकृती नाही


दात्याला ऑपरेशन थिएटरमध्ये नेऊन काळजीपूर्वक अवयव काढले जातात, त्यामुळे शरीरात कोणतीही विकृती होत नाही. जिवंत व्यक्तीवर शस्त्रक्रिया करताना जसा कट मारतात तसाच मृतकाच्या शरीरावर कट मारला जातो आणि नंतर टाके मारले जातात.

### भरपाई किंवा देय

मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा 1994 अंतर्गत मरणोत्तर अवयव दानासाठी कोणतीही भरपाई किंवा देय देण्याची तरतूद नाही. तथापि, एकदा कुटुंबाने अवयव दानासाठी संमती दिल्यानंतर, कुटुंबाकडून चाचणी प्रक्रियेसाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही.

### अवयवदान केल्यानंतर शरीर दान

सामान्यत: अवयव/ ऊती दान केल्यानंतर किंवा मृत्यूनंतर शवविच्छेदन (पोस्टमार्टम) झाल्यानंतर, मृतदेह शिक्षण किंवा संशोधनाच्या उद्देशाने स्वीकारला जात नाहीत. परंतु, केवळ कॉर्निया दान केल्यानंतर, शरीर संशोधनासाठी देता येऊ शकते.



**जीवनाची ज्योत विझल्यानंतरही**
**तुमचे आयुष्य तेवत ठेवा.**

जीवनाच्या नंतरही जगा...
अवयव दाता व्हा..
जीवन वाचवा...




### अवयवदानाला प्रोत्साहन देण्यासाठी तुम्ही खालीलप्रमाणे मदत करू शकता

- अवयव दाता बनून, आणि इतरांचे जीवन वाचविण्याच्या आपल्या निर्णयाबद्दल आपल्या तुमच्या कुटुंबियांशी बातचीत करून.

- आपल्या कामाच्या ठिकाणी, आपल्या समुदायात, आपल्या प्रार्थनास्थळी आणि आपल्या नागरी संस्थांमध्ये लोकांना प्रेरित करून अवयव दान आणि ऊती दानाला प्रोत्साहन देऊ शकता.

### अवयव आणि ऊती मरणोत्तर दान केले जाऊ शकतात





जीवन अनमोल आहे
वाया घालवू नका
**जिवंतपणी रक्तदान, मरणोत्तर अवयव दान**

### नोटो (NOTTO)

देशात अवयव आणि ऊती दान तसेच प्रत्यारोपणाच्या प्रचारासाठी आरोग्य सेवा महासंचालनालयाच्या अंतर्गत भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय द्वारा नॅशनल ऑर्गन अँड टिश्यू ट्रान्सप्लांट ऑर्गनायझेशन (नोटो) ची स्थापना करण्यात आली आहे. नोटो ही नवी दिल्लीतील सफदरजंग हॉस्पिटल परिसरामध्ये इन्स्टिट्यूट ऑफ पॅथॉलॉजी (ICMR) इमारतीच्या चौथ्या आणि पाचव्या मजल्यावर स्थित राष्ट्रीय स्तरावरील संस्था आहे.

NOTTO राष्ट्रीय नेटवर्क बनविण्यासाठी, पाच क्षेत्रांमध्ये प्रादेशिक अवयव आणि ऊती प्रत्यारोपण संस्था (रोटो) आणि प्रत्येक राज्य / केंद्रशासित प्रदेशमध्ये राज्य अवयव आणि ऊती प्रत्यारोपण संस्था (सोटो) विकसित करत आहे. दूरदृष्टी : मानवी अवयव प्रत्यारोपण सुधारित कायदा आणि सुधारित नियमांच्या कक्षेत अवयव निकामी झाल्याने होणारे अकाली मृत्यू टाळून जीवन वाचवण्यासाठी.



### दूरदृष्टी

मानवी अवयव प्रत्यारोपण सुधारित कायदा आणि सुधारित नियमांच्या कक्षेत अवयव निकामी झाल्याने होणारे अकाली मृत्यू टाळून जीवन वाचवण्यासाठी.

### लक्ष्य

प्रभावी राष्ट्रीय, मरणोत्तर अवयव आणि ऊती दान प्रणाली स्थापन करणे.

### उद्दिष्ट

मरणोत्तर अवयव आणि ऊती दानाला प्रोत्साहन देऊन प्रत्यारोपणाची गरज असलेल्या नागरिकांचे जीवन सुधारणे.

### अवयव दाता बना

आपले अवयव आणि ऊती दान करण्याची शपथ घ्या. आपल्या कुटुंबियांसमक्ष आपली अवयव आणि ऊती दान करण्याची इच्छा जाहीर करा, कारण मृत्यूच्या दुर्दैवी घटनेच्या वेळी, अवयव/ ऊती दान करण्यासाठी त्यांची संमती आवश्यक असते.




## आजच शपथ घ्या
## जीवन वाचविण्याची

### अधिक माहितीसाठी आणि वचन घेण्यासाठी कृपया संपर्क साधा :

**नोटो**
राष्ट्रीय अवयव आणि ऊती प्रत्यारोपण संघटना
डीजीएचएस, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार, चौथा मजला, एनआयओपी बिल्डिंग, सफदरजंग हॉस्पिटल कॅम्पस, नवी दिल्ली-110029.
**ई-मेल :** dir@notto.nic.in
**वेबसाइट :** www.notto.nic.in
**हेल्पलाइन क्रमांक :** 1800-11-4770



# अवयव आणि ऊती प्रत्यारोपण

## नेहमी विचारले जाणारे प्रश्न

**अवयवदान आणि ऊती दान म्हणजे काय?**

कायमस्वरूपी अवयव निकामी झाल्यामुळे मृत्यूच्या उंबरठ्यावर असलेल्या आणि वेळेत अवयव न मिळाल्यास मृत्यू होऊ शकतो अशा रुग्णांसाठी, त्यांच्या अवयवांचे किंवा ऊतींचे मरणोत्तर दान ही जीवनाची देणगी आहे. अवयवदान ही एक अतिशय उदार कृती आहे, जी गरजू रुग्णांचे जीवन वाचवते आणि बदलते. अवयव दानामुळे दरवर्षी लाखो रुग्णांचे प्राण वाचू शकतात.

मृत्यूनंतरही अनेक ऊतींचे दान करता येते. ऊतींचे दान रुग्णाच्या जीवनाची गुणवत्ता बदलते. जसे नेत्रदान (कॉर्निया डोनेशन) अंधांना दृष्टी देते. ऊतींची पुनर्बांधणी कंकाल दोष दुरुस्त करू शकते, रुग्णांचे जलद पुनर्वसन करू शकते आणि वेदना कमी करू शकते.

**अवयव प्रत्यारोपण म्हणजे काय?**

अवयव किंवा ऊती प्रत्यारोपणामध्ये जिवंत किंवा मृत व्यक्तीच्या शरीरातून निरोगी अवयव किंवा ऊती काढून टाकणे आणि गरज असलेल्या रुग्णामध्ये त्याचे प्रत्यारोपण करणे समाविष्ट आहे.

**अवयव किंवा ऊतींचे दान कसे करावे?**

अवयव दान किंवा ऊती दान हे तीन प्रकारे केले जाते.

- **ब्रेन स्टेम मृत्यूनंतर दान** : यामध्ये ब्रेन स्टेम मृत झाल्यामुळे व्यक्ती मृत घोषित केली जाते. ब्रेन स्टेम डेड डोनर नेहमी आयसीयूमध्ये आणि व्हेंटिलेटरवर असतो.
- **हृदयाच्या विफलतेमुळे मृत्यूनंतर दान** : याचा अर्थ, जेव्हा हृदयाची धडधड थांबते आणि मृत्यू होतो तेव्हा मृत्यूनंतर फक्त ऊती दान केले जाऊ शकते, जसे की नेत्रदान आणि त्वचा दान.
- **जिवंत व्यक्तींकडून दान** : जिवंत लोक त्यांच्या जवळच्या नातेवाईकांना किंवा गरजू रुग्णांना त्यांच्या संमतीने प्रेम आणि आपुलकीने अवयव दान करू शकतात, वैद्यकीय शस्त्रक्रियेद्वारे किडनी, (कारण आपल्याकडे दोन मूत्रपिंड आहेत). यकृत किंवा फुफ्फुसाचा एक छोटासा भाग दान केला जाऊ शकतो. हिप किंवा गुडघा बदलण्याच्या शस्त्रक्रियेदरम्यान काढलेली हाडे किंवा प्लेसेंटा देखील दान केले जाऊ शकतात.




**अवयवदानासाठी कोण पात्र होऊ शकते?**

कोणत्याही वयोगटातील व्यक्ती अवयव दान करू शकतात. अवयव प्रत्यारोपण करणारे डॉक्टर प्रथम अवयव दान करण्यासाठी दाता वैद्यकीयदृष्ट्या योग्य आहे की नाही हे तपासतात. अवयव प्रत्यारोपणापूर्वी अवयवाची तपासणी आणि चाचणी केल्यानंतरच अवयव दान केले जाते. साधारणपणे, आपल्यापैकी अधिकांश संभाव्य दाते आहेत.

**मृत्यूनंतर आपण कोणते अवयव किंवा ऊती दान करू शकतो?**

मेंदूच्या मृत्यू (ब्रेन डेथ) नंतरच हृदय, फुफ्फुस, यकृत, मूत्रपिंड, मोठे आतडे, स्वादुपिंड यांसारखे अवयव दान करता येतात. हृदयाच्या झडपा, हाडे, टेंडन, अस्थिबंधन, त्वचा आणि कॉर्निया, हृदय बंद पडल्यानंतर दान केले जाऊ शकतात. मृत्यूनंतर 6 तासांच्या आत नेत्रदान आणि त्वचा दान शक्य आहे.

एक अवयव दाता 8 लोकांचे प्राण वाचू शकतो. एक ऊती दाता सुमारे 50 लोकांच्या आरोग्यात सुधारणा करू

शकतो, कारण दान केलेल्या ऊती वेगवेगळ्या आकारात कापल्या जाऊ शकतात आणि अनेक रुग्णांसाठी वापरल्या जाऊ शकतात.

**अवयव दान प्रक्रियेला किती वेळ लागतो?**

मृत्यूनंतर साधारण 6 तासांच्या आत ऊतींचे दान करता येते. मृत्यूनंतर अंतर्गत अवयवांचे दान करता येते. ब्रेन डेड व्यक्तीच्या हृदयाचे ठोके कृत्रिमरित्या 36 ते 72 तासांपर्यंत राखले जाऊ शकतात. अवयव दानाच्या संमतीनंतर एखाद्या प्रिय व्यक्तीचे शरीर परत मिळण्यासाठी 24 तास लागू शकतात. प्रत्येक दानासाठी लागणारा कालावधी हा अवयव दान करण्याची अवयवांची संख्या, दाता ज्या रुग्णालयात आहे त्या ठिकाणापासून प्राप्त करणाऱ्याच्या रुग्णालयापर्यंतचे अंतर, ते अवयव देण्यासाठी लागणारा वेळ, वैद्यकीय-कायदेशीर प्रक्रिया इत्यादींवर अवलंबून असतो. या सर्व बाबी लक्षात घेऊन अवयव दात्याच्या नातेवाईकांनी संयम बाळगून सहकार्य करणे गरजेचे असते. त्यांच्या या महान निर्णयामुळे अनेक गरजू रुग्णांना वाचवले जाऊ शकते.

**ब्रेन डेथ म्हणजे काय?**

ब्रेन स्टेमला कायमची दुखापत झालेल्या व्यक्तीला ब्रेन डेड घोषित केले जाते. ब्रेन डेड लोक स्वतःहून श्वास घेऊ शकत नाही आणि चेतना परत मिळवता येऊ शकत नाही. कारण श्वास आणि चेतना या दोन्हीचे मुख्य केंद्र ब्रेन स्टेम आहे, जो मेंदूचा एक महत्त्वाचा भाग आहे. तथापि, ब्रेन स्टेम मृत व्यक्तीला कृत्रिम व्हेंटिलेटर आणि इतर उपकरणांशी जोडण्याची परवानगी दिली जाते त्यामुळे त्यांचे हृदय जवळपास 36 ते 72 तास काम करू शकते आणि अवयवांना ऑक्सिजन पुरवणे चालू ठेवू शकते. या काळात जवळच्या नातेवाईकांच्या संमतीने अवयव दान करता येते. संभाव्य अवयव दाता व्हेंटिलेटरवर असल्याने ब्रेन स्टेम डेथ ची घोषणा केवळ मान्यता प्राप्त हॉस्पिटलच्या आयसीयूमध्ये केली जाऊ शकते.

**ब्रेन स्टेम डेथ कसे घोषित केले जाते?**

चार सरकारी मान्यता प्राप्त डॉक्टरांच्या समिती बेन स्टेम डेथची घोषणा करते. या चार डॉक्टरांचा प्रत्यारोपणाच्या शस्त्रक्रियेशी काहीही संबंध नसतो. हे डॉक्टर किमान 6 तासांच्या अंतराने दोनदा ब्रेन स्टेम डेथ चाचण्या करून मेंदूच्या मृत्यूचे निदान करतात. अवयव दानासाठी राज्य सरकारने मान्यता दिलेल्या रुग्णालयातच ब्रेन स्टेम मृत्यू घोषित केला जाऊ शकतो आणि हे डॉक्टर ब्रेन डेड सर्टिफिकेटवर सही करतात. ब्रेन स्टेम डेथ घोषित करण्याचे निकष जगभरात स्वीकारले गेले आहेत. मेंदू मृत व्यक्तीच्या नातेवाईकांना अवयव दानानंतर मृत्यू प्रमाणपत्र दिले जाते.

**ब्रेन डेड घोषित केल्यावर एखादी व्यक्ती जिवंत राहण्याची शक्यता आहे का?**

नाही. ब्रेन स्टेम डेड व्यक्ती मृत आहे आणि त्याची जगण्याची काहीही शक्यता नाही. ब्रेन स्टेम मृत्यूचा इच्छामरणाशी काहीही संबंध नाही. ब्रेन स्टेम डेथ व्यक्तीचे अवयव ब्रेन स्टेम डेथ घोषित केल्यानंतरच घेतले जातात. सर्व कोमा रुग्ण ब्रेन स्टेम डेथ नसतात. कोमॅटोज रुग्णाचा मेंदूचा स्टेम जास्त काळ सक्रिय राहू शकतो आणि पुन्हा चेतना येण्याची शक्यता असते. ब्रेन स्टेम डेथ ही कोमाच्या पलीकडे असलेली एक अवस्था आहे, ज्यामध्ये एखादी व्यक्ती मरते आणि चेतना परत येण्याची शक्यता नसते. अवयव दान हे दात्याच्या जीवाच्या किमतीवर कधीच केले जात नाही.

**भारतात अवयव आणि ऊतींचे दान कायदेशीर आहे का?**

होय. भारतात, अवयव दान, मानवी अवयव आणि ऊती प्रत्यारोपण कायदेशीर आहे. अवयव दात्याची ओळख गुप्त ठेवली जाते, तसेच ज्या रुग्णांना अवयव मिळाले आहेत त्यांना अवयव दात्याचे नाव व पत्ताही देण्यात येत नाही.

**अवयव आणि ऊती दान केल्यानंतर दात्याच्या शरीरात काही विकृती उद्भवतात का?**

नाही. अवयवांना काळजीपूर्वक शस्त्रक्रियेद्वारे ऑपरेशन थिएटरमध्ये काढले जाते. अवयव काढणे ही इतर कोणत्याही शस्त्रक्रियेप्रमाणेच प्रक्रिया आहे आणि दात्याच्या शरीराला कोणतीही हानी होत नाही. जेव्हा अवयव तसेच ऊतींचे दान केले जाते, तेव्हा पाय किंवा हाताला देखील चिरा दिल्या जातात, परंतु त्यानंतर तो भाग काळजीपूर्वक शिवला जातो जेणेकरून कोणतीही विकृती होणार नाही. अवयवांमध्ये हाडे दान केल्यास, हाडे काढून टाकल्यानंतर हात आणि पाय यांना आकार दिला जातो, जेणेकरून शरीर विकृत होणार नाही. इतर कोणत्याही शस्त्रक्रियेप्रमाणे,

दात्याच्या शरीरातून अवयव काढून टाकताना खबरदारी घेतली जाते. अवयव आणि ऊतींचे दान केल्यानंतर नातेवाईक मृतदेहावर अंतिम संस्कार करू शकतात.

**अवयव दानाला आपला धर्म मान्यता देतो का?**

होय. भारतातील सर्व धर्म अवयव आणि ऊतींचे दान हे चांगले कार्य मानतात; कारण यामुळे अनेकांना नवीन जीवन मिळते.

**अवयव दानानंतर दात्याच्या नातेवाईकांना काही नुकसान भरपाई मिळते का?**

नाही. अवयव आणि ऊतींचे दान हे एक परोपकारी आणि नि:स्वार्थी कार्य आहे, त्यामुळे अवयव दात्याच्या नातेवाईकांना कोणतीही आर्थिक भरपाई दिली जात नाही. मात्र, अवयव दान करताना अवयव दानासाठी केल्या जाणाऱ्या चाचण्या किंवा चाचण्यांचा खर्च दात्याच्या नातेवाईकांना सहन करावा लागत नाही. मानवी शरीराचे अवयव विकत घेता किंवा विकता येत नाहीत. अवयव प्रत्यारोपण कायदा 1994 अंतर्गत हा दंडनीय गुन्हा आहे.

**एखादी व्यक्ती अवयव आणि ऊतींचे दान कसे करू शकते?**

व्यक्तीच्या मृत्यूनंतर, व्यक्तीच्या शरीराची जबाबदारी त्याच्या जवळच्या नातेवाईकांची असते. त्यामुळे अवयव दानासाठी त्यांची संमती आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीने अवयव दानाचा फॉर्म किंवा कार्ड भरले तरी जवळच्या नातेवाईकांचा निर्णय अंतिम असतो. त्यामुळे तुमच्या अवयव दानाच्या निर्णयाबद्दल तुमच्या नातेवाईकांना सांगणे आणि त्यांच्याशी चर्चा करणे महत्त्वाचे आहे. तुम्ही त्यांना हे सांगा कायदा, 1994 अंतर्गत हे केले जाते. त्या कायद्यात 2011 मध्ये सुधारणा करण्यात आली आणि 2014 मध्ये कायद्याचे नियम मंजूर करण्यात आले. हा कायदा उपचारासाठी अवयव काढणे, साठवणे आणि अवयव प्रत्यारोपणासाठी नियम लागू करतो. हा कायदा अवयवांच्या विक्री आणि खरेदीवर बंदी घालतो. हा कायदा ब्रेन स्टेम डेथला मान्य करतो आणि ब्रेन स्टेम डेथ घोषित करण्यासाठी नियम लागू करतो.

**अवयव दानानंतर दात्याचा मृतदेह नातेवाइकांना परत केला जातो का?**

होय. अवयव दानानंतर, दात्याचा मृतदेह नातेवाईकांना सन्मानपूर्वक अंत्यसंस्कारासाठी परत केला जातो. अवयवदा न हे शरीर दानापेक्षा वेगळे आहे. मृत व्यक्तीचे शरीर वैद्यकीय महाविद्यालयाच्या शरीरशास्त्र विभागाला दान केले जाते जेणेकरून विद्यार्थी आणि डॉक्टर या मृतदेहाचा अभ्यास किंवा संशोधनासाठी वापर करू शकतील. देहदानात मृतदेह अंत्यसंस्कारासाठी परत केला जात नाही.

**अवयव आणि ऊती फक्त श्रीमंत किंवा संपन्न लोकांनाच दिली जातात का?**

नाही. दान केलेल्या अवयवांचे वितरण सरकारने स्थापन केलेल्या संस्थेमार्फतच केले जाते. राज्य सरकारने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे प्रतीक्षा यादी तयार केली जाते. ही प्रतीक्षा यादी तयार करताना रुग्णाचे वय, रक्त प्रकार, प्रतीक्षा कालावधी आणि रुग्णाची वैद्यकीय स्थिती या बाबी लक्षात ठेवल्या जातात. अवयव वितरणाच्या वेळी रुग्णाची आर्थिक, सामाजिक स्थिती किंवा धर्म याला महत्त्व नसते.

महाराष्ट्रात, प्रतीक्षा यादी व अवयव वितरण प्राथमिक स्तरावर शासकीय संस्था झोनल ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेशन सेंटर (ZTCC) द्वारे केले जाते.

प्रादेशिक आणि राज्य ऊती प्रत्यारोपण संस्था (ROTTO-SOTTO) राज्य आणि प्रादेशिक स्तरावर अवयवांचे वितरण करते. राष्ट्रीय स्तरावर हे काम नॅशनल ऑर्गन टिश्यू ट्रान्सप्लांट ऑर्गनायझेशन (NOTTO) द्वारे केले जाते.

कृत्रिम आणि सेंद्रिय रूपात ऊती उपलब्ध असल्यामुळे नेत्रपटल (कॉर्निया) व्यतिरिक्त उतींसाठी प्रतीक्षा यादी नसते.

**अवयव दात्याच्या नातेवाईकांना अवयव प्राप्त झालेल्या रुग्णाविषयी किंवा ओळख याविषयी माहिती दिली जाते का?**

नाही. अवयव मिळविणाऱ्या रुग्णांची आणि अवयव दात्याची माहिती नातेवाईकांना दिली जात नाही. वयवदानामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात. ते एखाद्याच्या आयुष्यातील दु:ख आणि वेदना कमी करून चांगले जीवन जगू शकतात. जेव्हा तुम्ही अवयव दान करण्याचा निर्णय घ्याल तेव्हा तुमच्या नातेवाईकांना जरूर सांगा. अंध व्यक्तीला पुन्हा दृष्टी मिळू शकते, जळालेल्या रुग्णाला त्वचा दानातून नवजीवन मिळू शकते.

नातेवाइकांना अवयव दानाविषयी सांगा की तुम्हाला काय वाटते, त्यामुळे त्यांना निर्णय घेणे सोपे जाईल. असे आढळून आले आहे की, दात्याने जर अवयव दानाची आपली इच्छा अगोदरच नातेवाईकांना कळवली असेल तर 96% नातेवाईक अवयव दान करण्यास संमती देतात आणि जर सांगितले नसेल तर 58% नातेवाईक अवयव दान करण्यास संमती देतील.

अवयव दान कार्ड भरा आणि ते नेहमी तुमच्याजवळ ठेवा. अवयव दान कार्डवर घरातील किमान एका सदस्याची स्वाक्षरी घ्या.

एक व्यक्ती अवयव दान केल्याने आठ लोकांचे प्राण वाचू शकतो.

**दान करण्यासाठी अर्ज आणि कार्ड खालील पत्त्यावर उपलब्ध आहे:**

प्रादेशिक व राज्य अवयव आणि ऊती प्रत्यारोपण संस्था (रोटो-सोटो)
केईएम हॉस्पिटल अँड जी.एस. मेडिकल कॉलेज,
न्यू बिल्डींग, 7 वा मजला, आचार्य दोंदे रोड,
परेल, मुंबई, 400012, महाराष्ट्र.
ई-मेल : rottosotto.mumbai@gmail.com
दुरध्वनी :+91 022 24107738 / 24107739/
+91 7021932447
राष्ट्रीय अवयव आणि ऊती प्रत्यारोपण संस्था (नोटो)
वेबसाईट : http://www.notto.gov.in
नोटो टोल फ्री हेल्पलाईन : 1800114770



# जागतिक अवयवदान दिन

दरवर्षी 13 ऑगस्टला 'जागतिक अवयवदान दिन' साजरा केला जातो. त्याचा उद्देश केवळ अवयवदानाचे महत्त्व सांगणे नाही, तर समाजात जिवंत उदाहरणांद्वारे जागरूकता निर्माण करणे आहे. एखाद्याचा मृत्यू अनेकांसाठी नवा जन्म ठरू शकतो आणि हीच अवयवदानाची खरी ताकद आहे. या वर्षी "Answering The Call" "कॉलला उत्तर देणे" ही थीम घेऊन साजरा करीत आहोत. श्री. प्रकाश आबिटकर, मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, महाराष्ट्र यांच्या विशेष पुढाकारातून व मा. उपसंचालक, आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या विशेष प्रयत्नाने शासनाचे विविध विभाग, सेवाभावी संस्था, समाजातील विविध घटक, शाळा, महाविद्यालये, खासगी आस्थापना, समाजसेवक, इत्यादी अवयवदानाच्या या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात सहभागी होत आहेत.

प्रत्येक अवयवाच्या प्रत्यारोपणासाठी काही नियम केलेले आहेत. रुग्ण दवाखान्यात भरती झाला म्हणजे त्याचे अवयव काढून घेणे, अनाथ मुले, व्यक्ती, भिकारी यांना पकडून अवयव काढून घेणे, पैशाचे आमिष दाखवून अवयव काढणे अशा प्रकारच्या घटनांमध्ये काही डॉक्टर्स व अवयवांची तस्करी करणारी माणसे सहभागी होती. त्यामुळे माणसे अपंग व्हायची, मृत्यूमुखी पडायची. अशा अवयव प्रत्यारोपणामध्ये गरजूंना फायदा व्हावा, त्या प्रक्रियेतील धोका कमी होऊन सुरक्षित प्रत्यारोपण होण्यासाठी अवयवदानाची प्रक्रिया आता कायद्यामुळे अधिक सुरक्षित झाली आहे. मानवी उपचाराकरिता तसेच मानवी अवयवांची व्यावसायिक विक्री होऊ नये म्हणून मानवी अवयव काढणे, जतन करणे, प्रत्यारोपण करणे यासाठी केंद्र सरकारने मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा 1994 लागू केला आहे. मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा 1994 मध्ये अंमलात आल्यानंतर प्रत्यारोपणाच्या संख्येत वरचेवर वाढ होत गेली. रिपोर्टनुसार 2024 या एका वर्षामध्ये 13,476 किडनी, 4,901 लिव्हर, 253 हृदय, 228 फुफ्फुसांचे आणि 44 स्वादुपिंडांचे प्रत्यारोपण करून रुग्णांना नवे जीवन देण्यात आले आहे. आताच्या स्थितीत संपूर्ण देशामध्ये लाखो मूत्रपिंड, यकृत व हृदय विकारांनी ग्रस्त रुग्ण असून ते अवयव दात्याच्या प्रतिक्षेत आहेत. प्रत्यक्षात ही आकडेवारी अधिक असून त्यात रोजच्या रोज वाढच होत आहे.

या प्रत्यारोपण कायद्यानुसार कोणत्याही नोंदणीकृत संबंधित डॉक्टरला कुठल्याही व्यक्तीचे अवयव काढणे, प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्यापूर्वी त्याचे परिणाम, धोके याची माहिती रुग्णास व त्याच्या नातेवाईकास दिली पाहिजे. या कायद्यांतर्गत नोंदणी केलेल्या रुग्णालयातच शस्त्रक्रिया केल्या जाऊ शकतात. त्याचबरोबर पीडित रुग्णासाठी अवयव देणारी व घेणारी व्यक्ती जवळचे नातेवाईक असणे गरजेचे असते. जर असे नातेवाईक नसतील तर प्रत्यारोपण समितीची परवानगी घेणे आवश्यक असते. या समितीतील सदस्यांकडून सखोल तपासणी केल्यानंतरच प्रत्यारोपणाचा मार्ग मोकळा होतो. त्याचबरोबर ज्या रुग्णावर प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करायची व तो जेथे दाखल आहे त्या रुग्णालयाच्या डॉक्टरांनी प्रत्यारोपण प्राधिकरण समितीला संपूर्ण माहिती देणे बंधनकारक आहे. तसेच संपूर्ण राज्यातील अवयवदान समन्वय करण्यासाठी मुंबई येथे 'झोनल ट्रान्सप्लांट को-ऑर्डिनेशन सेंटर' उभे करण्यात आले आहे. या सेंटरच्या छत्रपती संभाजीनगर, पुणे, नागपूर येथे शाखा सुरू करण्यात आल्या असून अवयवदान प्रक्रियेत सुसूत्रता आणण्याचे काम केले जाते. मोठ्या शहरातील कोणत्या रुग्णालयात किती गरजू रुग्णांना अवयवाची गरज आहे. दाते कोण आहेत, याची संपूर्ण माहिती जिल्हा शासकीय रुग्णालयात उपलब्ध आहे.

**कोणते अवयव दान करता येतात?**

हृदय, फुफ्फुसे, यकृत, किडनी, स्वादुपिंड आणि लहान आतडे, हाडे,अस्थिमज्जा, त्वचा, कॉर्निया,इ. हे अवयव दान केले जाऊ शकतात. मात्र, हृदयविकाराने मृत्यू झाल्यास हृदय दान शक्य नसते आणि मधुमेह असलेल्या व्यक्तीचे स्वादुपिंड दान करता येत नाही. मेंदूमृत दाता त्याच्या दोन किडन्या, यकृत, हृदय, स्वादुपिंड आणि लहान आतडे दान करू शकतो यामुळे एका व्यक्तीकडून आठ जीव वाचवणे शक्य होते.

कोण दान करू शकतो

अवयवदान कुणीही करू शकते. आपल्याकडे अनेक उदाहरणे आहेत. मुलाने वडिलांना किडनी दिली. बहिणीने भावाला दिली. मुलाने वडिलांना यकृत दिले. तर फ्रॉन्सिसच्या हृदयामुळे हरिप्रसादला जीवनदान मिळाल्याचे ऐकतो. कुठे ऋषिकेशच्या किडनीमुळे इब्राहिमचे आयुष्य फुलले अशा बातम्या वाचतो. अवयवदानाला ना जात आडवी येते ना धर्म! म्हणूनच अवयवदान हे जात-धर्मापेक्षा सर्वश्रेष्ठ आहे. अवयवदानाची प्रक्रिया सोपी आहे.

- जिवंत दाते – पालक, भावंड, पती-पत्नी किंवा मुले यांना अवयवदान करू शकतात.
- दात्याची वैद्यकीय तपासणी आणि रक्तगट जुळणी आवश्यक.
- नातेवाईक नसल्यास जिल्हा किंवा राज्यस्तरीय प्राधिकरणाची परवानगी गरजेची.
- मेंदूमृत्यू किंवा हृदयविकारामुळे मृत्यू झाल्यावरच मृत व्यक्तीचे अवयव दान करता येतात; त्यासाठी कुटुंबाची लेखी संमती आवश्यक.
- अवयवदान हे पूर्णपणे मोफत आणि स्वेच्छेने असावे; पैशांचा व्यवहार हा कायदेशीर गुन्हा आहे.
- प्रत्यारोपण फक्त सरकारमान्य रुग्णालयांमध्येच करता येते.
- दाते 18 ते 65 वयोगटातील, निरोगी असावेत आणि कर्करोग, एचआयव्ही, हेपेटायटीस किंवा अनियंत्रित मधुमेहासारखे गंभीर आजार नसावेत.

अवयवदान हा फक्त वैद्यकीय विषय नाही; तो माणुसकीचा सर्वात सुंदर चेहरा आहे. स्वतःचा एक छोटा भाग कोणाला तरी जगण्यासाठी देणे म्हणजे अमरत्व प्राप्त करण्यासारखेच आहे. आपल्या मृत्यूनंतरही आपण कोणाच्या तरी धडधडत्या हृदयात, श्वासात, रक्तात जगत राहतो याहून मोठा वारसा दुसरा कोणताच नाही. यंदाच्या जागतिक अवयवदान दिनानिमित्त स्वतःशी एक वचन द्या "मी माझे अवयवदान करणार!" कारण एका व्यक्तीचा संकल्प अनेकांचे आयुष्य बदलू शकतो. जगामध्ये स्पेन हा देश अवयवदानात पहिल्या क्रमांकावर असून इंग्लंड, अमेरिका, हॉंगकॉंग, जपान आदी देशात एक लाख मृत्यूच्या मागे 50 जण अवयवदान करतात. त्या प्रमाणात भारतात हे प्रमाण खूपच कमी आहे. नॅशनल हेल्थ पोर्टलच्या मते स्पेनमध्ये 35 टक्के तर अमेरिकेत 26 टक्के आणि त्याच्या तुलनेत आपल्या देशात प्रती दशलक्ष लोकसंख्येमागे केवळ 0.65 टक्के अवयवदान केले जाते. चला तर मग आपल्या देशाचा नंबर देखील या यादीत वरच्या ठिकाणी आणूया

https://notto.abdm.gov.in/pledger-login या लिंक वर अवयदानाची प्रतिज्ञा करू या.

**महेंद्र दिगंबरराव वाघमारे**
जिल्हा विस्तार व माध्यम, अधिकारी
नागपूर



# अंगदान-जीवन संजीवनी अभियान अंतर्गत 'दोस्त मुंबई' ने राबवली विशेष मोहीम

**मोहिमेविषयी:**

दोस्त मुंबई ही सामाजिक सेवाभावी संस्था 23 वर्षांपासून आरोग्य व ईतर सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. विशेषतः मागील 14 वर्षांपासून संस्था मुंबई परिसरात अवयव दान जनजागृतीचे कार्य करत आहे. दिनांक 3 ऑगस्ट 2025 ते 15 ऑगस्ट 2025 या कालावधीत महाराष्ट्र शासनाने अंगदान जीवन संजीवनी अभियान या नावाने अवयवदान पंधरवडा साजरा करण्याचे ठरवले होते. अवयवदानाविषयी जागरूकता पसरवणे, अवयवदानासंबंधीचे गैरसमज दूर करणे, राज्यातील नागरिकांना मृत्यूनंतर अवयव आणि ऊतींचे दान करण्यास प्रेरित करणे आणि त्यांच्या जीवनात अवयवदानाचे मूल्य वृद्धिंगत करणे हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट होते. या अभियानाअंतर्गत विविध सामाजिक संस्थांना अवयव दान या विषयावर सामाजिक जनजागृतीचे कार्य करण्याचे निर्देश देण्यात आले होते. व्याख्यान, चर्चासत्र, रॅली, स्पर्धेचे आयोजन अशा विविध मार्गाने अनेक संस्थांनी या अभियानामध्ये सहभाग नोंदवला. दोस्त मुंबईने या बाबत पुढाकार घेऊन नवी मुंबई आणि पनवेल परिसरात विविध कार्यक्रम आयोजित केले व जनजागृती चे कार्य केले.

**मोहीम राबवण्यासाठी बनविली टीम:**

दोस्त मुंबई ही संस्था गेल्या 11 वर्षांपासून पंढरपूरच्या वारीमध्ये अनेक विद्यार्थ्यांना सोबत घेऊन अवयव



दानाविषयी जनजागृतीचे कार्य करत आहे. त्यातील काही विद्यार्थ्यांना अवयव दानाविषयी समाजात जाऊन काम करण्याची इच्छा होती; त्यांना अवयव दानाविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. त्यातूनच, डॉ.अभिजीत बुधकर, डॉ पुजा शुक्ला, स्नेहल हांडे, प्रितेश गावंडे, श्रुतुजा खोदाडे, सृष्टी ओंबाळे, यश सिंग, श्रीकांत गावित आणि स्वतः डॉ कैलास जवादे अशा 9 जणांची टीम या कार्यासाठी उभी राहिली. डॉ कैलास जवादे यांनी कार्यक्रमादरम्यान नेमके काय बोलायचे यासाठी पीपीटी तयार केली. श्रीकांत गावित यांनी सर्वांसोबत संपर्क करण्याचे काम केले. डॉ.अभिजीत व इतर सर्वांनी समन्वयाने कसे कार्यक्रम पार पाडायचे याविषयी मंथन केले. दोस्तच्या अध्यक्षा डॉ वैशाली बंडे, सचिव डॉ गोविंद जवादे व कोषाध्यक्ष श्री प्रमोद चुंचूवार यांनी सतत पाठबळ दिले. तेरा दिवसाच्या या कालावधीत एकूण 11 कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आणि ते यशस्वीपणे पार पाडले गेले.

**संस्थांचा सहभाग व समन्वय:**

आजचे युग एकत्र येऊन काम करण्याचे युग आहे. समाजामध्ये अवयव दानाचे प्रमाण वाढवण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. हा विचार समोर ठेवूनच पनवेल महानगरपालिका, डॉ नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय पनवेल, दोस्त मुंबई व झोनल ट्रान्सप्लांट को-ऑर्डिनेशन सेंटर मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने या अभियानाची अंमलबजावणी करण्यात आली. पनवेल महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ आनंद गोसावी, उपजिल्हा रुग्णालयाचे प्रभारी अधीक्षक डॉ अशोक गीते, झेड टी सी सी मुंबई चे अध्यक्ष डॉ सुरेंद्र माथुर, कोर्डिनेटर श्रीमती उर्मिला महाजन, माजी वैद्यकीय संचालक डॉ प्रवीण शिंगारे व ज्येष्ठ प्रत्यारोपण तज्ञ डॉक्टर वत्सला त्रिवेदी यांनी आवश्यक सहकार्य व मौलिक मार्गदर्शन केले. आयोजनाची सर्व जबाबदारी दोस्त मुंबईने सांभाळली. विविध संस्थांमधील पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा करून कार्यक्रमाचे

आयोजन केले गेले. प्रत्येक ठिकाणी अवयव दानाची जाणीव असणाऱ्या व्यक्तीला अभियानामध्ये सहभागी करून घेण्यात आले. एकीचे बळ मिळते फळ या उक्तिप्रमाणे एकत्र येऊन काम केल्याने अभियानाचे उद्दिष्ट साध्य करता आले.

**कार्यक्रमाचे स्वरूप:**

11 ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्या कार्यक्रमांचा जवळपास दीड हजार जणांनी लाभ घेतला. बहुतांश ठिकाणी अवयवादानावरील व्याख्यान व नंतर प्रश्नमंजुषेचा कार्यक्रम अशा पद्धतीने कार्यक्रम पार पाडल्या गेला. गेल्या काही दिवसांमध्ये शासनाने नॉन ट्रान्सप्लांट ऑर्गन रिट्रीव्हल सेंटर बाबत युद्ध पातळीवर कार्य करण्याचे ठरवले आहे. दोस्त मुंबईच्या वतीने पंढरपूरच्या वारी दरम्यान याबाबत विशेष मोहीम राबवण्यात आली होती म्हणूनच, पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी व्यावसायिकांसाठी पनवेल महानगरपालिकेने व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे एनटीओआरसी सेल्सिटायझेशन या कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमात पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील पन्नासहून अधिक रुग्णालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते. डॉ कैलास जवादे यांनी उपस्थित प्रतिनिधींना एन टी ओ आर सी बाबत सविस्तर माहिती दिली. 25 बेड्स, 5 आयसीयू बेड आणि 1 ऑपरेशन थिएटर असणाऱ्या शहरातील सर्व रुग्णालयांनी लवकरात लवकर स्वतःच्या रुग्णालयाची एन. टी.ओ.आर.सी म्हणून नोंदणी करून घ्यावी असे आवाहन त्यांनी केले.

एकंदरीतच, या अभियानामध्ये विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती निर्माण करण्यावर भर देण्यात आला. त्यामुळेच डी.वाय.पाटील विद्यापीठातील एन.सी.सी युनिट व फार्मसी कॉलेज, डी.वाय पाटील रुग्णालय, एम.जी.एम कॉलेज, येरला होमिओपॅथी कॉलेज आणि येरला आयुर्वेदिक कॉलेज, सी के टी कॉलेज पनवेल या महाविद्यालयांमधून हे अभियान राबवण्यात आले. या सर्व ठिकाणी दोस्त मुंबई विद्यार्थ्यांसाठी राबवत असलेल्या विविध कार्यक्रमाची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने अवयव दानाच्या या कार्यात सहभागी व्हावे असे आव्हान करण्यात आले. इच्छुक विद्यार्थ्यांनी दोस्त मुंबई स्टुडन्ट फोरम मध्ये सदस्य म्हणून जॉईन झाल्यास त्यांना याबाबतीत मोफत प्रशिक्षण देण्यात येईल असही सांगण्यात आले. बऱ्याच विद्यार्थ्यांनी अवयव दानाचे संकल्प केले व या कार्यात सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केली.

दिनांक 14 तारखेला शहरातील प्रसिद्ध वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात अवयवदान जनजागृती सोबतच विविध आरोग्य कार्यक्रम आयोजित केले. महानगरपालिकेने त्या कार्यक्रमात तीन रुग्णवाहिकांचे लोकार्पण केले. कॅन्सर चा वाढता धोका लक्षात घेता टाटा मेमोरियल हॉस्पिटल सोबत पनवेल महानगरपालिकेने प्रशिक्षण व प्राथमिक तपासणीसाठी एकत्रित काम करण्यासाठी बनवण्यात आलेल्या समन्वय करारावरती स्वाक्षरी करून कराराचे हस्तांतरण केले. उपजिल्हा रुग्णालयात चालू करण्यात आलेल्या जठरांत्र व प्रत्यारोपण शल्यचिकित्सा बाह्य रुग्ण विभागाचे सन्माननीय आमदार श्री प्रशांत दादा ठाकूर यांच्या हस्ते आभासी पद्धतीने उद्घाटन करण्यात आले. दोस्त मुंबईच्या वतीने याप्रसंगी जठरांत्र शल्यचिकित्सा आजार, अवयव प्रत्यारोपण व अवयव दान या विषयावर रुग्णालयीन कर्मचारी, महाविद्यालयाचे प्राध्यापक, विद्यार्थी, आशा सेविका आणि परिचारिका यांच्यामध्ये जाणीव जागृती करण्याच्या दृष्टीने विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात दोस्त व झेड टी सी सी च्या वतीने उपस्थित सर्वांना उपरोक्त विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. उपजिल्हा रुग्णालयातील नव्याने सुरुवात करण्यात आलेल्या या बाह्य रुग्ण विभागाचा उपयोग जास्तीत जास्त गरजू लोकांना व्हावा अशी भावना याप्रसंगी डॉ कैलास जवादे यांनी व्यक्त केली.





संपूर्ण अभियानादरम्यान सर्वांनी अवयव दानाचे संकल्प अर्ज भरून द्यावेत यावर भर देण्यात आला. ऑनलाइन पद्धतीने अर्ज केल्यानंतर ताबडतोब अवयव दान संकल्प केल्याचे प्रमाणपत्र संकल्प केलेल्या व्यक्तीस मिळते हे दाखवून दिले. संकल्प करण्यात काही अडचणी येत असतील तर संस्थेचे स्वयंसेवक त्यांना मदत करतील असेही सांगितले. दोस्त मुंबईच्या वतीने या यावर्षीच्या वारी दरम्यान सर्वांना देण्यासाठी अवयव दान संकल्प कार्ड तयार करण्यात आले होते. त्या कार्डवर अवयव दानाविषयीचे विविध संकल्प नमूद केलेले होते. सी के टी कॉलेज खांदा कॉलनी, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह व गोल्ड क्रेस्ट रेसिडेन्सी या ठिकाणी झालेल्या कार्यक्रमांमध्ये उपस्थित सर्वांकडून अवयव दानाचे संकल्प करून घेण्यात आले. एकंदरीतच या निमित्ताने सर्वांच्या मनावरती अवयव दानाचे महत्त्व बिंबवले गेले.

**भविष्यातील उपक्रम:**

केंद्र शासनाने सांगितल्याप्रमाणे अंगदान जीवन संजीवनी अभियान हे केवळ पंधरवड्या पुरते मर्यादित न राहता वर्षभर चालू राहावे आणि त्यातून एक सामाजिक चळवळ उभी राहावी यासाठी दोस्त मुंबई प्रयत्नशील राहणार आहे. गुजरात येथील आय के डी आर सी _आय टी एस या संस्थेच्या धर्तीवर महाराष्ट्रामध्ये भविष्यात गरजू रुग्णांना मोफत प्रत्यारोपण शल्यचिकित्सा करणारे केंद्र उभे करता यावे यासाठीही संस्था कार्य करणार आहे. सर्वांच्या सहकार्याने आणि एकत्रित प्रयत्नाने हे शिवधनुष्य उचलणे शक्य होणार आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्राला सन्मा. श्री देवेंद्रजी फडणवीस यांच्यासारखे मोठे नेतृत्व लाभलेले आहे. माननीय आरोग्य मंत्री श्री प्रकाश आबिटकर तसेच राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांना देखील अवयव दान व प्रत्यारोपण या क्षेत्रात भरीव कार्य करण्याची इच्छा आहे. स्थानिक पातळीवर पनवेल चे आमदार श्री प्रशांत दादा ठाकूर यांनी स्वतः अवयव दानाचा संकल्प केलेला आहे. या सर्वांच्या सहकार्याने दोस्त मुंबई अवयव दान व प्रत्यारोपण क्षेत्रात मोठे कार्य करण्यासाठी सज्ज आहे. अंगदान जीवन संजीवनी अभियाना अंतर्गत तेरा दिवसात 11 ठिकाणी यशस्वी कार्यक्रम राबवून संस्थेने त्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

**डॉ. कैलास जवादे**
जठरांत्र व प्रत्यारोपण शल्यचिकित्सक
संस्थापक, दोस्त मुंबई



# आईचे दूध
# बाळाचा जन्मसिद्ध हक्क !

प्रत्येक वर्षी 1 ते 7 ऑगस्ट या कालावधीत 'जागतिक स्तनपान सप्ताह' पाळला जातो. यामागचा उद्देश एकच — **आईचे दूध ही बाळाची पहिली आणि सर्वोत्तम खुराक आहे,** याची जाणीव सर्वांना असावी.

**मी आपली एक डॉक्टर म्हणून तुम्हा सर्व नागरिकांना काही महत्त्वाचे मुद्दे सांगू इच्छिते:**
प्रथम, स्तनपान हे बाळासाठी फक्त अन्न नाही, तर ते बाळाच्या आरोग्याचे, सुरक्षा आणि प्रेमाचे मूळ स्रोत आहे. आईचे दूध बाळाला संसर्गांपासून वाचवते, रोगप्रतिकारक शक्ती वाढवते आणि मानसिक व शारीरिक विकासासाठी अत्यावश्यक असते.



बाळ जन्मल्यानंतर पहिल्या एका तासात स्तनपान सुरू करणे फार आवश्यक आहे.

**पहिल्या पिवळसर दुधाला 'सुवर्ण बिंदू' म्हणतात**
त्यात अँटीबॉडीज असतात, जे बाळाला आजारांपासून वाचवतात.

**पहिले 6 महिने बाळाला केवळ आईचे दूधच द्या.**
ना पाणी, ना साखरपाणी, ना सूप – फक्त आईचे दूधच ! यामुळे बाळाच्या पचनक्रियेला कोणतीही अडचण येत नाही.

**आईला देखील याचा मोठा फायदा होतो.**
स्तनपानामुळे गर्भाशयाचा आकार लवकर पूर्ववत होतो, रक्तस्त्राव कमी होतो, आणि स्तनाच्या कर्करोगाचा धोका कमी होतो.

**काम करणाऱ्या महिलांसाठी माझा विशेष संदेश आहे**
आपण आपल्या हक्कांबाबत सजग व्हा. स्तनपानासाठी विश्रांती, स्तनपान कक्ष, पाळणाघर या सुविधा संस्थांमध्ये असणे आवश्यक आहे शासनाकडून बऱ्याच ठिकाणी उपलब्ध आहे.

पती, कुटुंबीय, आणि समाज यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

आईला मानसिक आधार द्या, तिच्या आरोग्याची काळजी घ्या. कारण एक निरोगी आईच निरोगी पिढी घडवू शकते.

**सरकारी धोरणे व मदत:**

- अनेक सरकारी रुग्णालयांमध्ये 'स्तनपान सल्लागार' म्हणून समुदाय आरोग्य अधिकारी , स्टाफ नर्स, डॉक्टर उपलब्ध आहेत.
- ICDS (आंगणवाडी) ,केंद्रांमधून माहिती दिली जाते.
- मातृवंदना योजना, जननी सुरक्षा योजना यांतर्गत स्तनपानाबद्दल माहिती व आधार दिला जातो.

स्तनपान हा केवळ आई आणि बाळाचा वैयक्तिक विषय नाही, तर तो एक सामाजिक आणि सार्वजनिक आरोग्याचा विषय आहे.

**या स्तनपान सप्ताहात आपण सर्वजण मिळून ठरवूया**

***"आईचे दूध – बाळाचा जन्मसिद्ध हक्क!"***

आपण सर्वांनी हे हक्क सर्वजण माणसा पर्यंत पोहोचवायचे आहेत.

**डॉ. सारिका अनमुलवाड**
प्रभारी वैद्यकीय अधिकारी गट - अ
प्राथमिक आरोग्य केंद्र कुंडलवाडी
ता. बिलोली जि. नांदेड

# स्तनपान सप्ताह (१ ते ७ ऑगस्ट)

दरवर्षीप्रमाणे या वर्षी देखील 1 ते 7 ऑगष्ट स्तनपान सप्ताह उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, तालुका स्तर, जिल्हा स्तर तसेच परिचारिका प्रशिक्षण विद्यालयात साजरा केला जातो. नवजात शिशुसाठी स्तनपान किती महत्वाचे आहे. त्याचे बाळाला व आईला कसे आरोग्यदायक आहे. हे वेगवेगळ्या माध्यमातून दाखविले जाते. साक्षर मातांना थोडे सांगितले तरी समजते. परंतु दृकश्राव्य साधनाचा उपयोग निरक्षर मातांना जास्त होतो. अर्थातच एका दिवसांत हे शक्य नाही. म्हणून ऑगस्ट महिन्याचे सात दिवस स्तनपान सप्ताह राबविण्यात येतो. या कार्यक्रमांत आशाताई, अंगणवाडी, आरोग्य सेविका, स्वास्थ्य अभ्यागता सक्रीय सहभाग घेतात. आपआपल्या स्तरावर हा आठवडा यशस्वीरित्या राबविला जातो.

- 1 ला दिवस - लेखी स्वरुपात त्याची प्रसिद्धी केली जाते व रंगीत पोस्टर्स लावले जातात.
- 2 रा दिवस - स्तनदा मातांना बोलावून त्यांचे स्तनपानाबद्दल मत विचारणे- त्रुटी असल्यास शंका निरसन करणे.
- 3 रा दिवस - माता व बालकाचे रंगीन चार्टस लावलेले असून उत्सुकतेने माता पाहतात.
- 4 था दिवस - स्तनपान करतांना मातेने कसे बसावे, तसेच बालकांना कसे धरावे. प्रात्यक्षिक करून दाखविणे.
- 5 वा दिवस - करून दाखविणे-
- 5 वा दिवस - स्तनदा मातेचे मुल कसे सुदृढ आहे, निरोगी आहे व स्तनपान न दिल्याने मुल कसे आहे हे दाखविले जाते.
- 6 वा दिवस - सुदृढ बालक स्पर्धा ठेवली जाते. माता व बालकांना आरोग्य शिक्षण दिले जाते.
- 7 वा दिवस - स्तनदा मातांचा सत्कार केला. त्यामुळे इतर स्तनदा माताना सुद्धा सकारात्मकता मिळते.

**स्तनपानाचे फायदे**

**मातेला होणारे फायदे**

"प्रथम दिनापासून आईने पाजावे बाळास जिवनसत्व अ, रोगप्रतिकारक शक्तीमुळे, प्रथिनामुळे महत्व आहे चिकास

- मातेला मानसिक आत्मिक समाधान मिळते.
- जिव्हाळ्याचे संबंध निर्माण होतात.
- अंगावर जाणारा रक्तस्त्राव कमी होतो.
- दोन मुलांत अंतर आपोआप वाढते.
- संसर्गजन्य आजाराला आळा बसतो.

**बाळाला होणारे फायदे**

- बाळाचे आईशी वात्सल्याचे संबंध निर्माण होतात.
- संसर्गजन्य आजाराला आळा बसतोः
- अर्ध्या तासाच्या आत चिक दुध मिळाल्याने त्यातील घटकही
- वेगळे पाणी पाजावे लागत नाही.
- संसर्गजन्य आजारांना आळा बसतो.

**स्तनपान म्हणजे काय?**

स्त - स्तनदा मातेचे मुल

न - नवसासारखे असते

पा - पांडुरंगाच्या कृपेने

न - नवलासारखे दिसते

**वर्षा देशपांडे**
सेवानिवृत्त सार्वजनिक आरोग्य परिचारिका
हिंगणा, नागपूर



# स्तनपान जनजागृती सप्ताह

नांदेड - जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संगीता देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड जिल्ह्यात 1 ऑगस्ट ते 7 ऑगस्ट 2025 या कालावधीत स्तनपान जनजागृती सप्ताह साजरा करण्यात आला.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मेघना कावली यांच्या हस्ते जागतिक स्तनपान सप्ताहाचे उद्घाटन प्राथमिक आरोग्य केंद्र तुप्पा येते करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी मार्गदर्शन करताना स्तनपानाचे महत्व अधोरेखित केले. आरोग्य विभाग, महिला व बाल कल्याण विभाग व जिल्हा परिषदेचे सर्व विभग प्रमुख यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषदेच्या विविध विभागांनी यात सक्रिय सहभाग घेतला.

या सप्ताहादरम्यान, माता आणि बालकांमध्ये स्तनपानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी अनेक स्पर्धा आणि कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यात प्रामुख्याने रांगोळी स्पर्धा, रोल प्ले, छोट्या नाटिका, स्तनपानविषयक गाणी, आणि चारोळ्या यांचा समावेश होता. या उपक्रमाद्वारे, स्तनपानाचे महत्व, त्याचे फायदे आणि योग्य पद्धती यांबद्दल सोप्या आणि प्रभावी भाषेत माहिती देण्यात आली. या सप्ताहाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, गरोदर माता आणि बालकांसाठी खास पुरस्कार ठेवण्यात आले होते. उत्तम आरोग्य आणि स्तनपानासाठी जागरूकता दाखवणाऱ्या मातांना 'हिरकणी पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले, तर सुद्दढ बालकांना सुपोषित बाल पुरस्कार' प्रदान करण्यात आला. या पुरस्कारांमुळे मातांमध्ये अधिक उत्साह निर्माण झाला आणि त्यांना स्तनपानासाठी पोत्साहन मिळाले.

दि. 07/08/25 रोजी प्रा.आ. केंद्र मुगट येथे जागतिक स्तनपान सप्ताहाचा समारोप करण्यात आला. सदरील कार्यक्रम दि. 01/07/2025 ते 07/07/2025 पर्यंत गरोदर स्त्रिया, स्तनदा माता व ते 6 महिन्यांची बालके यांची आशा, आरोग्य सेविका व समुदाय आरोग्य अधिकारी यांचे मार्फत घरोघरी भेटी देवून तपासणी करण्यात आली. गरोदर मातेला व स्तनदा मातेला आहाराचे व स्तनपानाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले, योग्य पध्दतीने स्तनपान करणे, बाळाला पुरक आहार या बद्दल मार्गदर्शन करण्यात आले. नांदेड जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांनी एकत्र येऊन हा सप्ताह यशस्वीरित्या साजरा केला. आयआयटी बॉम्बे ने प्रशिक्षण देऊन जे प्रशिक्षक तयार केले होते त्यांच्याद्वारे जिल्ह्यातील सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांना अंगणव वर्कर यांना प्रशिक्षण देण्यात आले.

नांदेड जिल्ह्यात आयआयटी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने स्तनपान व आहार संदभति 7,800 आरोग्य कर्मचारी अंगणवाडी सेविका व अशा कार्यकर्ते यांच्या ऑनलाइन परीक्षा घेण्यात आली. तसेच स्तनपान सप्ताहात प्रत्यक्ष कार्यशाळा घेण्यात आली. त्यात आयआयटी, मुंबईच्या माध्यमातून प्रशिक्षित झालेल्या ट्रेनर मार्फत जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेविका 710, समुदाय आरोग्य अधिकारी 274, अशा सेविका 1749, bcm 16, प्रशिक्षणार्थी सहभागी होते. या सर्वांनी आपल्या कार्यक्षेत्रात निर्धारित गरोदर माता नवजात बालके, स्तनदा माता, पूरक आहार देणारे बालके, तसेच पाच वर्षाखालील बालके यांना प्रशिक्षण दिलेली आहेत.

या स्तनपान सप्ताहाचे औचित्य साधून आयआयटी, मुंबईच्या तज्ञांनी दिलेल्या प्रशिक्षण दिलेल्या प्रशिक्षकाद्वारे आपल्या जिल्ह्यातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रत व या सप्ताहात गरोदर माता स्तनदा माता यांना स्तनपानाचे महत्त्व पटवून द्यावे, असे स्तनपान देण्याचे योग्य पद्धती, स्थिती व पकड, प्रशिक्षण देण्यात आले. सप्ताहात जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या अधिनस्त तालुक्यातील पा.आ.केंद्र चे पर्यवेक्षण करण्यात आले.

स्तनपान हा नवजात बालकासाठी आणि मातेसाठी अत्यंत महत्त्वाचा आणि नैसर्गिक आहार आहे. बाळाच्या

जन्मानंतर सहा महिन्यांपर्यंत केवळ स्तनपान केल्याने त्याचे शारीरिक आणि मानसिक पोषण योग्य प्रकारे होते. या काळात बाळाला आवश्यक असलेले सर्व पोषक घटक, जीवनसत्त्वे आणि पाणी स्तनपानातून मिळतात. बाळाला अनेक गंभीर आजारांपासून वाचवण्यासाठी तसेच त्याची रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी स्तनपान खूप उपयुक्त ठरते. अनेक ठिकाणी या महत्त्वाच्या नैसर्गिक प्रक्रियेबद्दल जागरूकता कमी आहे. विविध सामाजिक आणि कौटुंबिक कारणांमुळे काही मातांना स्तनपान करण्याबद्दल योग्य मार्गदर्शन मिळत नाही. त्यामुळे, स्तनपानाचे फायदे सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी, तसेच मातांना योग्य सहकार्य देण्यासाठी जागतिक स्तनपान दरवर्षी 1 ते 7 ऑगस्ट दरम्यान जगभरात साजरा केला जातो.

**स्तनपान सप्ताहाचा संकल्प**

हा सप्ताह साजरा करण्यामागे एकच संकल्प आहे: "प्रत्येक आईला आणि बाळाला स्तनपानाचा हक्क आणि योग्य वातावरण मिळवून देणे."

या संकल्पनेअंतर्गत, स्तनपानाकडे केवळ एक आरोग्यविषयक विषय म्हणून न पाहता, त्याला एक सामाजिक आणि मानवी हक्क म्हणून प्रोत्साहन देणे हा मुख्य उद्देश आहे. कार्यस्थळी, सार्वजनिक ठिकाणी आणि समाजात मातांना स्तनपान करण्यासाठी योग्य आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे, तसेच त्यांना आवश्यक ते सर्व सहकार्य मिळवून देणे हा यामागचा मूळ विचार आहे.

**स्तनपान सप्ताहाची उद्दिष्ट्ये**

स्तनपान सप्ताहाच्या माध्यमातून खालील उद्दिष्ट्ये साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो :

- **जागरूकता वाढवणे**
  समाजात, कुटुंबात आणि विशेषतः नवमातांमध्ये स्तनपानाचे फायदे आणि त्याचे महत्व याबद्दल जागरूकता वाढवणे, स्तनपानामुळे बाळ आणि आई दोघांनाही होणारे फायदे वैज्ञानिक माहितीसह लोकांपर्यंत पोहोचवणे.
- **सहकार्यासाठी प्रोत्साहन**
  नवमातांना स्तनपानासाठी त्यांच्या कुटुंबाकडून, आरोग्य कर्मचाऱ्यांकडून, आणि कामाच्या ठिकाणी योग्य सहकार्य आणि पाठिंबा मिळावा यासाठी प्रोत्साहन देणे. यामध्ये, स्तनपान करताना येणाऱ्या अडचणींवर उपाय सांगणे आणि मानसिक आधार देणे यांचा समावेश आहे.
- **गैरसमज दूर करणे**
  स्तनपानाविषयी समाजात असलेले गैरसमज आणि अंधश्रद्धा दूर करणे. उदा. "स्तनपान केल्याने आईचे सौंदर्य कमी होते" किंवा "बाळाला इतर दूध देणे अधिक सोयीचे आहे" अशा चुकीच्या कल्पनांना वैज्ञानिक माहितीच्या आधारे स्पष्टीकरण देऊन मोडीत काढणे.
- **समाजाचा सहभाग**
  स्तनपानाला प्रोत्साहन देण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग वाढवणे. पुरुष, वडील, आजी-आजोबा, आणि मित्र-मैत्रिणी यांनाही स्तनपानाचे महत्त्व पटवून देऊन मातांना पाठिंबा देण्यासाठी तयार करणे.



## यशोगाथा

# सिंदी रेल्वे प्राथमिक आरोग्य केंद्राची 'डबल' आनंदाची गाथा!



वर्धा जिल्ह्यातील सिंदी रेल्वे येथील प्राथमिक आरोग्य केंद्र हे केवळ आरोग्य सेवा देणारे ठिकाण नाही, तर ते आता आशा आणि आनंदाचे प्रतीक बनले आहे. या केंद्राने नुकतीच एक अविश्वसनीय यशोगाथा अनुभवली, जिथे एकाच वेळी दोन निरोगी जीव जन्माला आले. एका गर्भवती मातेची जुळ्या मुलींची यशस्वी प्रसूती करून या केंद्राने माता आणि बाल आरोग्य सेवेतील आपली उत्कृष्टता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.

या मातेने सुरुवातीपासूनच सिंदी रेल्वे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सेवांवर विश्वास ठेवला होता. तिची नियमित तपासणी, डॉक्टरांचे योग्य मार्गदर्शन आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची प्रेमळ काळजी यामुळे तिच्या गर्भधारणेचा प्रवास पूर्णपणे सुरक्षित आणि चिंतामुक्त झाला. हीच काळजी आणि नियोजनबद्धता प्रसूतीच्या अंतिम क्षणीही दिसून आली.

### समर्पण आणि कौशल्याची परिसीमा

डॉ. शबाना खान, डॉ. आचल ठाकरे आणि आरोग्य सेविका लता श्रीनाथ यांच्या नेतृत्वाखालील समर्पित आरोग्य पथकाने ही प्रसूती यशस्वीपणे पार पाडली. पहाटेच्या शांत वेळी, जेव्हा प्रत्येकजण झोपेत होता, तेव्हा हे पथक एका नवीन जीवनाच्या स्वागतासाठी सज्ज झाले होते. त्यांच्या अथक प्रयत्नांना यश मिळाले आणि एका पाठोपाठ एक, दोन गोड जीवांनी या जगात प्रवेश केला. दि. 17 ऑगस्ट रोजी ही घटना घडली.

- **पहिली राजकुमारी:** सकाळी 5 वाजून 12 मिनिटांनी, 2 किलो 350 ग्रॅम वजनाची, अत्यंत निरोगी मुलगी जन्माला आली.
- **दुसरी राजकुमारी:** त्यानंतर 19 मिनिटांनी, सकाळी 5 वाजून 31 मिनिटांनी, 2 किलो 640 ग्रॅम वजनाची दुसरी गोड मुलगी जन्माला आली.
- दोन्ही बाळांची प्रकृती पूर्णपणे उत्तम असून, त्यांच्या डोळ्यांतील चमक आणि रडण्याचा गोड आवाज संपूर्ण केंद्रात आनंदाची लहर घेऊन आला.

### नवजीवनाचे स्वागत आणि भावी पिढीची काळजी

प्रसूतीनंतरही आरोग्य पथकाने आपली जबाबदारी अत्यंत काळजीपूर्वक पार पाडली. राष्ट्रीय आरोग्य प्रोटोकॉलनुसार दोन्ही नवजात बाळांना लगेचच आवश्यक लसीकरण करण्यात आले. तसेच, माता आणि बाळांच्या भविष्यातील आरोग्याची खात्री करण्यासाठी त्यांना पुढील महत्त्वाच्या गोष्टींवर मार्गदर्शन करण्यात आले:

- **योग्य स्तनपानाचे महत्त्व आणि पद्धत**ी.
- प्रसूतीनंतर मातेने स्वतःची काळजी कशी घ्यावी.
- बाळांच्या निरोगी वाढीसाठी आवश्यक आहार आणि स्वच्छता.



**विश्वासाची आणि दर्जेदार सेवेची ओळख**

ही यशस्वी प्रसूती केवळ एका कुटुंबाचा आनंद नाही, तर सिंदी रेल्वे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या उच्च दर्जाच्या सेवा, कर्मचाऱ्यांचे समर्पण आणि तयारीची ही एक तेजस्वी साक्ष आहे. स्थानिक लोकांसाठी आता हे केंद्र केवळ उपचाराचे ठिकाण नसून, सुरक्षित आणि आरोग्यदायी भविष्याची हमी देणारे केंद्र बनले आहे.

या यशोगाथेने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की, सुरक्षित प्रसूती आणि माता-बाल आरोग्य संरक्षणासाठी आरोग्य संस्थेतच प्रसूती करणे किती महत्त्वाचे आहे. सिंदी रेल्वेच्या या 'डबल' आनंदाच्या क्षणाने अनेकांना प्रेरणा दिली आहे. आई आणि दोन्ही निरोगी मुलींना पाहून संपूर्ण आरोग्य केंद्रात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण आहे.

हा आनंददायी क्षण साजरा करताना, आरोग्य कर्मचाऱ्यांनी या कुटुंबाला भरभरून शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या चेहऱ्यावरचे समाधान हेच त्यांच्या कामाचे सर्वात मोठे बक्षीस ठरले.

# स्पर्श प्रेमाचा स्पर्श वात्सल्याचा

**'स्तनपान हेच बाळाचे अमृतपान'**

## बाळास मिळणारे फायदे

- आजारांपासून संरक्षण होते
- मातेचे दूध हे परिपूर्ण अन्न आहे
- आरोग्यवर्धक आणि निर्मळ असते
- पचनास सोपे असते



**स्तनपान....**

**विकल्प नसून एक संकल्प आहे.**

# आयुष्यमान भारत शालेय आरोग्य कार्यक्रम

## (School Health and Wellness Program) अंतर्गत राज्यस्तरीय प्रशिक्षकांचे प्रशिक्षण

सार्वजनिक आरोग्य विभागाने पौगंडावस्थेतील मुलांच्या आरोग्य सुधारणेसाठी आयुष्यमान भारत शालेय आरोग्य कार्यक्रम (एसएचडब्ल्यूपी) बळकटीकरणाचा उपक्रम हाती घेत राज्यस्तरीय प्रशिक्षकांचे प्रशिक्षण (टीओटी) आयोजित केले आहे.

**पौगंडावस्थेतील आरोग्य सुधारणेचे महत्त्व**

पौगंडावस्थेतील मुले हे राज्याच्या लोकसंख्येच्या अंदाजे 20% आहेत. या वयोगटातील मुलांना पोषणाची कमतरता, मानसिक तणाव, मादक द्रव्यांचे सेवन, हिंसाचार आणि प्रजनन आरोग्याशी संबंधित समस्यांचा सामना करावा लागतो. आयुष्मान भारत कार्यक्रमाअंतर्गत शालेय आरोग्य कार्यक्रम (SHWP) हा राज्यातील 24 जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत असून या अंतर्गत सर्व शासकीय आणि शासकीय अनुदानित शाळांमध्ये प्रतिबंधात्मक, प्रोत्साहनपर आणि समुदायिक आरोग्य शिक्षण देण्यात येणार आहे.

ह्या कार्यक्रमाचे यश हे प्रशिक्षित आणि प्रेरित शिक्षकांवर अवलंबून आहे. याकरीता प्रत्येक शाळेमध्ये दोन शिक्षक (शक्यतो एक पुरुष आणि एक महिला) "आरोग्य आणि कल्याण दूत" "Health and Wellness Ambasador" म्हणून नियुक्त करण्यात येत आहेत . ह्या निवडण्यात आलेल्या आरोग्य दूत यांना पौगंडावस्थेतील मुलांच्या गरजांनुसार वयानुसार, संवेदनशील आरोग्य शिक्षणाचे उपक्रम राबविण्यासाठी प्रशिक्षित करण्यात येणार आहेत.

**राज्यस्तरीय प्रशिक्षण: क्षमता निर्माण आणि नेतृत्व**

ह्या करिता 4 दिवसीय प्रशिक्षण सार्वजनिक आरोग्य विभाग व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT) यांच्या सयुक्त विद्यमाने दिनांक 18 ऑगस्ट ते 21 ऑगस्ट दरम्यान आयोजित करण्यात येत आहे. प्राचार्य विभागीय आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, प्राचार्य DIET व वैद्यकीय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण पथक, यांचा समावेश या प्रशिक्षणामध्ये आहे.

प्रशिक्षणाचे उद्घाटन डॉ विजय कंदेवाड मा संचालक आरोग्य सेवा, डॉ संदीप सांगळे अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा, मा कमलादेवी आवटे सह संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद व मा डॉ रेखा गायकवाड, उपसंचालक आरोग्य सेवा राज्य कुटुंब कल्याण कार्यालय यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या प्रसंगी, मा अरुण जाधव उपसंचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण



परिषद व डॉ प्रवीण वेदपाठक सहाय्यक संचालक किशोरवयीन आरोग्य हे उपस्थित होते. या प्रशिक्षणाच्या आयोजनाकरिता करिता युनिसेफ महाराष्ट्र यांचे सहकार्य लाभले. याप्रसंगी उपस्थित अधिकारी यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.

**या प्रशिक्षणामध्ये पौगंडावस्थेतील आरोग्याबाबतच्या 11 विषयांवर प्रशिक्षण घेण्यात येणार असुन यामध्ये खालील मुख्य विषयांचा समावेश आहे:**

- पोषण, आरोग्य आणि स्वच्छता
- भावनिक आणि मानसिक आरोग्य
- लैंगिक समानता
- इंटरनेट चा सावध वापर व समाज माध्यमांचा वापर
- हिंसा आणि इजेपासून बचाव व सुरक्षा
- आरोग्यदायी जीवनशैली

सदर प्रशिक्षणाकरिता राष्ट्रीय स्तरावरील संस्थांचे प्रशिक्षक (PHFI, Center for Catalyzing Change (C3), UNICEF, Arpan, Expressions India) तसेच NCERT च्या माजी डीन डॉ सरोज यादव हे प्रशिक्षक लाभले आहेत. मास्टर ट्रेनर्सना प्रथम राज्यस्तरावर प्रशिक्षित केल्यानंतर ह्या प्रशिक्षकांमार्फत जिल्हा पातळीवर जिल्ह्यांतील सर्व शासकीय आणि शासकीय अनुदानित शाळांमधील मुख्याध्यापक व शिक्षकांचे प्रशिक्षण घेण्यात येणार आहे.

**राज्य कुटुंब कल्याण कार्यालय आरोग्य सेवा संचालक कार्यालय पुणे , महाराष्ट्र**

दिनांक: 18 ऑगस्ट 2025












यशोगाथा:

# आशा माऊली आणि तिच्या बाहुलीची कहाणी

IICARE FOUNDATION द्वारे समर्थित

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यातील बदलापूर येथील आशा स्वयंसेविका सौ. संजीवनी धोंडीराम पाटील या नावातच एक आश्वासक जाणीव दडलेली आहे. त्यांचा प्रवास केवळ आरोग्य कर्मचाऱ्याचा नाही, तर मायेच्या स्पर्शाने आयुष्याला दिशा देणाऱ्या माऊलीचा आहे. ही कथा आहे एका मानसिक दृष्ट्या अस्वस्थ असलेल्या तरुणीची, जिला तिच्या स्वतःच्या गरोदरपणाचीही कल्पना नव्हती, आणि त्या मातेसह तिच्या अजन्म्या बाळाला संजीवनी ताईंनी कसे वाचवले, याबद्दलची.



एक दिवस त्यांच्या कार्यक्षेत्रातील एका मुलीच्या पोटाचा आकार पाहून संजीवनी ताईंना शंका आली. ती केवळ शंका नव्हती, ती अनुभवाची नजर होती. त्यांनी तिला न सांगता थेट प्राथमिक आरोग्य केंद्रात तपासणीसाठी नेले आणि गरोदरपणाची पुष्टी झाली. परंतु ही तर सुरुवात होती. त्या तरुणीची मानसिक स्थिती इतकी अस्थिर होती की तिला औषधोपचार, तपासणी, किंवा कोणत्याही सल्ल्याचे भान नव्हते. वेळ पुढे सरकत होता, आणि अखेर तो दिवस उजाडला.

सकाळपासूनच प्रसववेदना सुरू झाल्या होत्या, पण ती मुलगी घराबाहेर धावत होती, मदतीस नकार देत होती, शिवीगाळ करत होती. अनेक जणांनी माघार घेतली असती, पण संजीवनी ताई तिथेच ठामपणे उभ्या राहिल्या. सायंकाळ होताच परिस्थिती बिघडत चालली होती. पाण्याची पिशवी फुटली होती, गर्भजल वाहत होते, पण ती सहकार्य करत नव्हती. अखेर संजीवनी ताईंनी त्यांच्या कुटुंबियांशी चर्चा केली आणि स्थानिकांच्या मदतीने तिला जबरदस्तीने रिक्षामध्ये बसवले व ग्रामीण रुग्णालयात नेले आणि सुरू झाला तिचा जिल्हा रुग्णालयापर्यंतचा संघर्षमय प्रवास.

ग्रामीण रुग्णालयातून 108 ॲम्ब्युलन्सने बदलापूरच्या सिव्हील हॉस्पिटलमध्ये—प्रत्येक ठिकाणी ती मुलगी आरडाओरडा करत होती. डॉक्टरांनाही शिवीगाळ केली जात होती. शेवटी पोलिसांच्या मदतीने तिच्या पतीला बोलावण्यात आले आणि पहाटे पाच वाजता तिची प्रसूती करण्यात आली आणि एका गोंडस मुलीचा सुरक्षितपणे जन्म झाला. 4 किलो वजनाची ती नवजात बाळ संजीवनी ताईंच्या जिद्दीचा परिणाम होती.

या घटनेने केवळ एक आई आणि बाळ नव्हे, तर आरोग्यसेवक म्हणून स्वतःवर विश्वास ठेवणाऱ्या संजीवनी ताईसाठीही हे यशाचे प्रतीक ठरले. समाजात आशा स्वयंसेवकांबद्दलचा आदर वाढला. सरकारी आरोग्य यंत्रणेवरील विश्वास दुणावला. याच कार्यासाठी त्यांना राज्यस्तरीय गौरवांसह अनेक संस्थांनी पुरस्कारांनी सन्मानित केले. पण त्यांच्यासाठी खरा सन्मान काय होता? तर त्या मुलीच्या डोळ्यात शांत झोपलेली आईपणाची भावना आणि तिच्या कुशीत गोंजारलेले निरागस बाळ.

“माझी मनोविकृत बाहुली आता एक सुखरूप आई आहे आणि मी – एक आशा ताई – तिच्या या प्रवासाची साक्षीदार. हेच माझे खऱ्या अर्थाने यश आहे.”

## कविता

# अवयवदान

मृत्यूनंतर मातीमोल होणारे शरीर अनमोल बनवूयात,
चला अवयवदान करूयात,
मृत्यूनंतरही आपल्या डोळ्यांनी जग पाहूयात,
एखाद्याच्या हृदयात राहूयात
तर एखाद्याच्या काळजाचा तुकडा होऊयात,
कोणाचे मूत्रपिंड तर कोणाचे स्वादुपिंड होऊयात,
आपणच आपले पिंड दान करूयात,
भाजलेल्यांना त्वचा देवून त्यांचा स्पर्श होऊयात,
तर एखाद्याला आतडे दान करून त्याची भूक वाढवूयात,
एखाद्याला फप्फुसे देवून त्याचा श्वास होऊयात,
मेल्यानंतरही जग अनुभवूयात,
चला देहदानच करूयात आणि
कलयुगातील दानशूर होऊयात.

स्वप्निल चव्हाण
जिल्हा विस्तार माध्यम अधिकारी, वाशिम

## कविता

# || स्तनपान ||

घेऊन पिऊ आईच्या कुशित,
बाळ झोपते एकदम खुशित.

कुशित ऊब, नजरेत माया,
आईच्या दुधानेच बनते बाळाची काया.

छोट्या ओठांनी केलेला स्पर्श
आईच्या उरातुन उमडतो हर्ष.

निरागस नजर, शांत चेहरा,
आईच्या दुधात स्वर्ग सारा.

संवेदनांचा उगम, विश्वासाचे बीज,
स्तनपान म्हणजे मातृत्वाचे चीज.

धावपळीच्या युगात होतेय स्तनपानाची उपेक्षा.
कशी कराल मग बाळाच्या आरोग्याची अपेक्षा ?

वरचे दूध व बेबी फूडच्या मातांनो नका करू हट्ट.
स्तनपानानेच होईल तुमचे बाळाशी नाते घट्ट.

भाऊसाहेब सांगतो, बाळाच्या जिवनातील हर्ष,
मातांनो स्तनपान करा - वर्ष.
मातांनो स्तनपान करा - वर्षे....

**भाऊसाहेब उत्तम देवगुंडे**
**प्रा. आ. केंद्र, केंदूर, तालुका : शिरूर, जिल्हा : पुणे**



# कविता

## || स्तनपान सप्ताह २०२५ ||

माँ का अमृत

माँ की गोद में जब शिशु सो जाता,
दूध की धारा से जीवन पाता।
नन्हीं हथेली जब उँगली थामे,
ममता के आँचल में खुशियाँ थामे।
यह दूध नहीं, अमृत की धारा है,
स्नेह, सुरक्षा, अपनापन सारा है।
भूख मिटे, मन भी तृप्त हो जाए,
हर कण में ममता समा जाए।
माँ का आँचल शीतल छाया,
प्यार ने संसार सजाया।
स्तनपान है प्रथम उपहार,
स्वास्थ्य, शक्ति और जीवन आधार।

मुजावर साबीरअहमद सैपोद्दीन
ब हु.आ. सेवक प्रशिक्षण केंद्र, पुणे

## || आईचे दूध ||

आईचे दूध जणू थव अमृताची,
ममतेची, समर्पणाची आणि बंधनाची,
ती ओळख अभिमानाची
आईचे दूध निर्मळ निस्वार्थ,
त्यात स्नेह त्यात माया त्यात ताकद पोषणाची,
ती सुरवात बाळाच्या सदृढ आयुष्याची ॥
आईचे दूध म्हणजे वरदान शक्तिशाली जीवनाचे,
ती भावना प्रेमाची, जिव्हाळ्याची त्यागाची
तो तेजस्वी बालक शान भारताची ॥

संकेत जयराम वाघमारे
आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, औंध, पुणे





# अंगदान -जीवन संजीवनी अभियान अंतर्गत नांदेड येथे जनजागृती रॅली संपन्न

नांदेड - अवयवदान दिनानिमित्त आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच आयुक्त आरोग्य सेवा, आयुक्तालय मुंबई यांच्या सूचनेनुसार संपूर्ण राज्यभरात 3 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट 2025 दरम्यान अंगदान - जीवन संजीवनी अभियान राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि. 3 ऑगस्ट रोजी मेघना कावली मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखून रॅलीची सुरुवात करण्यात आली.

मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा 1994 नुसार 3 ऑगस्ट 1994 रोजी भारतामध्ये पहिले हृदय प्रत्यारोपण प्रक्रिया पार पडल्यामुळे 3 ऑगस्ट हा दिवस अवयवदान दिन म्हणून साजरा केला जातो. हा उद्देश समोर ठेवून या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ही रॅली शहरातील आय टी आय कॉर्नर येथील महात्मा फुले पुतळ्यापासून श्री गुरू गोबिंद सिंघजी स्मारक, जिल्हा रुग्णालय नांदेड अशी काढण्यात आली.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, अधिष्ठाता डॉ सुधीर देशमुख, डॉ.यशवंत पाटील अधिष्ठाता शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय नांदेड, डॉ. संजय पेरके जिल्हा शल्यचिकित्सक श्री गुरू गोबिंद सिंघजी स्मारक, जिल्हा रुग्णालय नांदेड, डॉ. संगीता देशमुख जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद नांदेड, डॉ हनुमंत पाटील आरएमओ, श्रीमती बोथीकर प्राचार्या शासकीय परिचर्या प्रशिक्षण केंद्र नांदेड, डॉ. प्ल्हाद कौटकर अध्यक्ष इंडियन मेडीकल असोसीएशन , डॉ. संजय देलमाडे अध्यक्ष निमा, डॉ. मैदपवाड स्टार किडनी सेंटर , इनेर्वेल क्लब चे अध्यक्ष विद्या पाटील, अवयवदान अर्पण समितीचे माधव अटकोरे, निमा वुमेन्स फोरम चे अध्यक्ष डॉ. करुणा जमदाडे व सचिव माया पवार हे उपस्थित होते.

रॅलीचा समारोप हा श्री गुरू गोबिंद सिंघजी स्मारक, जिल्हा रुग्णालय नांदेड येथे झाला. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली अवयव दान जनजागृती कार्यक्रम दिनांक 3 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट दरम्यान साजरा केला जाणार असून या कालावधीत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. अवयवदानामुळे एक व्यक्ती 8 लोकांचे जीवन वाचवू शकतो. यासाठी प्रत्येक व्यक्तीने अवयवदानाचा संकल्प करावा तसेच अधिक माहितीसाठी टोल फ्री क्रमांक (24*7) 1800-1147-70 संपर्क साधावा.

weblink
– https://notto.abdm.gov.in/pledge-registry/&website www.notto.mohfw.gov.in

तसेच शहरातील व जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी अवयवदानाचा संकल्प करून या अभियानामध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय पेरके यांनी केले. या कार्यक्रमासाठी जिल्हा रुग्णालय नांदेड येथील सर्व अधिकारी कर्मचारी व शासकीय परिचर्या प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थी उपस्थित होते.



# जागतिक स्तनपान सप्ताह निमित्त जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन

नाशिक - जागतिक स्तनपान सप्ताह 2025 (1 ऑगस्ट ते 7 ऑगस्ट) अंतर्गत स्तनपानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी दि. 5 ऑगस्ट 2025 रोजी जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे एक भव्य जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या वर्षीचा जागतिक स्तनपान सप्ताहाचा मुख्य विषय (थीम) : "स्तनपानाला प्राधान्य द्या: शाश्वत पाठबळ प्रणाली निर्माण करूया" ही आहे तर टॅगलाईन "स्तनपानात गुंतवणूक करा, भविष्य घडवा" ही आहे.



कार्यक्रमात आदरणीय जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, स्तनपान हे केवळ पोषणाचे माध्यम नसून, नवजात बाळाच्या आरोग्याचा कणा आहे. आईचे दूध – ज्यात foremilk आणि hindmilk चा समावेश असतो – बाळासाठी संपूर्ण व संतुलित आहार आहे. स्तनपानाचे फायदे केवळ बाळासाठी नव्हे तर आईसाठीही आहेत.

मातेला दूध येण्यासाठी आणि ते वाढवण्यासाठी कुठले घरगुती पदार्थांचं सेवन करायला हवं ह्याचे प्रात्यक्षिक स्वरूपात प्रदर्शन देखील येथील dietician श्रीमती रंजिता शर्मा यांनी सादर केले. डॉ अविनाश गोरे यांनी संपूर्ण स्तनपान हे कसं असावं याबद्दल त्यांनी माहिती दिली. त्याची योग्य माहिती समाजाच्या प्रत्येक थरापर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता आहे.तसेच स्तनपान हे केवळ मातेची जबाबदारी नसून ती एक सामाजिक जबाबदारी आहे आणि त्यासाठी शाश्वत पाठबळ प्रणाली तयार करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

डॉ. सुधाकर मोरे, जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. निलेश पाटील, अति. जिल्हा शल्यचिकित्सक, डॉ. राजेंद्र बागुल, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमामध्ये S N C U, P I C U व बालरोग कक्षातील स्टाफ नर्सेस/नर्सिंग ऑफिसर्स आणि अधिसेविका श्रीमती अनिता भालेराव यांच्या नेतृत्वाखाली स्तनपानावरील प्रभावी नाटक सादर करण्यात आले, ज्याने उपस्थितांची मने जिंकली. State Midwifery Training Institute येथील Nurse Practitioner Midwifery Educators यांनीही एक सुंदर नाट्य सादर करत स्तनपानाबाबत जनजागृती केली. कार्यक्रमाला नर्सिंग विद्यार्थी, रुग्ण व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण सप्ताहभर विविध उपक्रम राबवले जात असून, स्तनपानाविषयी जागरूकता निर्माण करण्यावर भर दिला जाणार आहे.

## स्तनपानाबद्दल अर्थपूर्ण संदेश देणाऱ्या नक्षीदार रांगोळींचे औंध येथील आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्रात प्रदर्शन

पुणे - आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, औंध येथील संस्था प्रमुख तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या सक्रिय सहभाग आणि मार्गदर्शनाखाली 01 ऑगस्ट ते 07 ऑगस्ट या कालावधीतील साजरा होणाऱ्या स्तनपान सप्ताहनिमित्त या संस्थेतील बहुउद्देशीय आरोग्य सेवक मूळ प्रशिक्षणार्थी यांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये पोस्टर स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, निबंध स्पर्धा, कविता स्पर्धा, त्याचबरोबर रांगोळी स्पर्धा अतिशय उत्साहाच्या वातावरणात घेण्यात आल्या. यामध्ये अनेकांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

स्तनपान सप्ताहच्या निमित्त आयोजित केलेल्या रांगोळी स्पर्धेमध्ये अनेकांनी भाग घेतला आणि स्तनपानाबद्दल आरोग्य शिक्षणाद्वारे, मार्मिकतेने, अतिशय सुंदर आणि अर्थपूर्ण समाजाला संदेश देणाऱ्या नक्षीदार रांगोळी काढल्या. या मनमोहक, सर्वांचे लक्ष वेधून घेणाऱ्या रांगोळ्या पाहण्यासाठी उपस्थितांनी हजेरी लावली. सर्व सहभागींनी अतिशय चांगल्या पद्धतीची घोषवाक्य,अर्थपूर्ण कविता, त्याचबरोबर पोस्टर तयार केले आणि निबंध लिहिले, तसेच अतिशय आगळावेगळा भास निर्माण करणाऱ्या या स्पर्धा सर्वांचं लक्ष वेधून घेताना दिसून आले. स्पर्धेसाठी संस्था प्रमुखाच्या मार्गदर्शनाखाली एक समिती स्थापन केली



## अवयवदान चळवळीत महाराष्ट्र अग्रेसर एक लाखापेक्षा जास्त नागरिकांचा अवयवदानाचा संकल्प

मुंबई : महाराष्ट्राने पुन्हा एकदा अवयवदान चळवळीत देशासमोर आदर्श घालून दिला आहे. राज्यातील एक लाखाहून अधिक नागरिकांनी अवयवदान प्रतिज्ञा नोंदणी करून समाजासाठी अमूल्य योगदान देण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात अंगदान–जीवन संजीवनी अभियान' अंतर्गत दि. 3 ते 15 ऑगस्ट 2025 या कालावधीत 'अवयवदान जनजागृती पंधरवडा' राबविण्यात आला. ही चळवळ यापुढेही वर्षभर सुरू राहणार आहे.

आरोग्य विभागाने राबविलेल्या जनजागृती मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आजपर्यंत राज्यातील 1,01,390 नागरिकांनी अवयवदान करण्याची प्रतिज्ञा नोंदणी केली आहे. राज्यात अवयवदानाबाबत व्यापक जनजागृती करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत 'अंगदान–जीवन संजीवनी अभियान' अंतर्गत 'अवयवदान जनजागृती पंधरवडा' राबविण्यात आली. अवयवदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. मेंदूमृत नंतरही अवयव रूपाने जिवंत राहण्याची ही एक अमूल्य संधी आहे. एखाद्या मेंदूमृत व्यक्तीचे अवयव दुसऱ्या अनेक रुग्णांचे प्राण वाचवू शकतात. मात्र यासाठी समाजात विश्वास निर्माण करणे, गैरसमज दूर करणे आणि अंधश्रद्धा मोडणे अत्यंत आवश्यक आहे.

# मरावे परी देह अन् अवयवरूपी उरावे

### जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रशांत वाडीकर

## अवयवदानामुळे आठ लोकांना नवीन जीवन मिळू शकते

कोल्हापूर - मृत्युनंतर देह संपतो परंतु अवयवदान केल्यास आपण आठ लोकांना नवीन जीवन देऊ शकतो. त्यामुळे 'मरावे परी देह अन् अवयवरूपी उरण्याचा प्रयत्न करावा', अशी माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रशांत वाडीकर यांनी दिली. सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत अंगदान-जीवन संजीवनी अभियान अंतर्गत दि. 15 ऑगस्टपर्यंत अवयवदान जनजागृती पंधरवडा राबवण्यात येत आहे. या निमित्त सीपीआर हॉस्पिटल येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. वाडीकर बोलत होते.

अवयवदानामध्ये मागणी व उपलब्धता यामध्ये प्रचंड तफावत असल्याने समाजात व्यापक जनजागृती होणे अत्यावश्यक आहे. यासाठी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात अवयवदान मोहीम राबविली जात आहे. या मोहिमेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून क्यूआर कोडद्वारे नोंदणीची सोय करण्यात आली असून, जास्तीत जास्त नागरिकांनी नोंदणी करून या जीवनदायिनी उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहनही डॉ. वाडीकर यांनी केले.

अवयवदानामध्ये कोल्हापूर जिल्हा प्रथम क्रमांकावर असून नेत्रदानामध्ये तिसऱ्या स्थानावर आहे तसेच प्रतिज्ञा फॉर्म भरण्यात राज्यात अव्वलस्थानी आहे. यावेळी योगेश अग्रवाल यांनी अवयवदान संबंधी सविस्तर माहिती दिली. सीपीआरचे जिल्हा सल्लागार डॉ. व्ही. ए. आरळेकर यांनी अवयवदानाची प्रतिज्ञा दिली. प्रशिक्षण महाविद्यालयाच्या प्राचार्य एस. पी. घाटगे यांनी स्वागत केले. जॉन लोखंडे यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.







# अंगदान-जीवनदान संजीवनी अभियान' अंतर्गत आरोग्य शिक्षण व संपर्क विभागाच्या कर्मचाऱ्यांनी घेतली अवयवदानाची शपथ

पुणे- अवयवदान ही केवळ एक वैद्यकीय क्रिया नाही, तर ती सामाजिक चळवळ आहे, या भावनेतून राज्य आरोग्य शिक्षण आणि संपर्क विभागाच्या कर्मचाऱ्यांनी आज अवयवदानाची शपथ घेतली. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागामार्फत 'अंगदान – जीवनदान संजीवनी अभियान' अंतर्गत दि. 3 ते 15 ऑगस्ट 2025 दरम्यान राज्यभर 'अवयवदान पंधरवडा' साजरा केला जात आहे. अवयवदानाबाबत जनजागृती करण्यासाठी राज्यभरात विविध उपक्रम राबविले जात आहेत.

या शपथविधी कार्यक्रमात आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. कैलास बाविस्कर, सहायक संचालक डॉ. संजयकुमार जठार, तसेच इतर अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी उपस्थितांनी एकत्रितपणे अवयवदानाची शपथ घेतली. त्याचप्रमाणे या संवेदनशील विषयाबाबत जागरूकता वाढवण्याची आणि स्वतः सहभागी होण्याची प्रतिज्ञा केली.

राज्य आरोग्य शिक्षण आणि संपर्क विभाग विविध माध्यमांतून अवयवदानाबाबतचा वैज्ञानिक दृष्टिकोन प्रसारित करत असून, समाजातील भीती, गैरसमज व अंधश्रद्धा दूर करण्यासाठी सर्वसामान्यांपर्यंत विविध माध्यमांद्वारे माहिती पोहचवत आहे आणि लोकांचे प्रबोधन करत आहे. राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागामार्फत राज्यभरात सध्या विविध जनजागृती उपक्रमांद्वारे 'अवयवदान पंधरवडा" राबविण्यात येत आहे. या पंधरवड्यात राज्यभरात विविध उपक्रम राबविले जात असून त्यामध्ये, समाज माध्यमाद्वारे जनजागृती मोहीम, शाळा-महाविद्यालयांमध्ये स्पर्धा, रॅली, पथनाट्ये, अवयवदात्यांच्या कुटुंबीयांचा सन्मान, जनजागृती स्टॉल्स व व्याख्याने आदी बाबींचा समावेश आहे. अवयवदान ही सर्वात मोठी माणुसकीची भेट असून, या मोहिमेतून "मरणानंतरही जीवदान" ही संकल्पना समाजात रुजवण्याचा प्रयत्न आहे.



# रुग्णांना नवजीवन देण्यासाठी राज्यभरात 'अवयवदान' चळवळ म्हणून राबवा

**प्रकाश आबिटकर,** आरोग्य मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

मुंबई – महाराष्ट्रातील अवयवदानाचे प्रमाण वाढावे व अवयवदानाच्या प्रतीक्षेत असलेल्या रुग्णांना नवजीवन मिळावे यासाठी येत्या 3 ते 15 ऑगस्ट दरम्यान अवयवदान ही एक चळवळ म्हणून राज्यभरात राबवावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मुंबई येथे आज आयोजित राज्यस्तरीय बैठकीत दिले.

राज्यात दि. 3 ते 15 ऑगस्ट या कालावधीत राज्यात 'अवयवदानपंधरवडा' म्हणून राबविण्यात येणार असून, यासाठी राज्यस्तरीय नियोजन बैठक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, आरोग्य राज्यमंत्री मेघनाताई साकोरे -बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आज आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत मार्गदर्शन करताना आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी राज्यात राबविण्यात येत असलेल्या अवयवदान उपक्रमाचा आढावा घेतला व अवयवदानाच्या प्रतीक्षेत असलेल्या रुग्णांसाठी त्यांना नवजीवन मिळावे, यासाठी अवयवदान ही एक चळवळ म्हणून राबवावी व व्यापक प्रमाणावर जनजागृती करावी, असे निर्देश दिले. अवयवदानाबाबत सकारात्मकरित्या मतपरिवर्तन करून अवयवदानाविषयी असणारी भीती कमी करावी, तसेच प्रभावीपणे पद्धतीने काम करून सकारात्मक परिणाम दिसतील अशी विश्वासार्ह मोहीम दि. 3 ते 15 ऑगस्ट 2025 या कालावधीत राबवावी, अशा सूचना दिल्या.

यावेळी आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनीही मार्गदर्शन करताना सांगितले की, अवयवदानाचे महत्त्व जनतेपर्यंत पोहोचवणे अत्यंत गरजेचे आहे. आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नातून अधिकाधिक रुग्णांना अवयव मिळावेत, यासाठी पंधरवड्यात प्रभावी कामकाज व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.
राज्यात 3 ऑगस्ट ते 15 ऑगस्ट या कालावधीत अवयवदान पंधरवडा म्हणून राबविण्यात येत असून विभागीय प्रत्यारोपण समिती मार्फत विभागनिहाय जनजागृतीसाठी विविध उपक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. ज्या कुटुंबीयांनी सामाजिक भान जागृत ठेवून मेंदू मृत झालेल्या रुग्णांच्या अवयवदानाचा निर्णय घेतला होता, त्यांचा तसेच अवयव दानामुळे नवजीवन प्राप्त झालेल्या व्यक्तींचा स्वातंत्र्यदिनी म्हणजेच 15 ऑगस्ट रोजी सर्व जिल्ह्यात पालकमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे.

या बैठकीला सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग यांचे अधिकारी तसेच रुग्णालय सहसंचालक डॉ. सुनिता गोल्हाईत, केईएम रुग्णालयाचे डॉ. आकाश शुक्ला , उपसंचालक, डॉ. कैलास बाविस्कर, सहायक संचालक डॉ. फडणीस व दूरदृश्य प्रणालीद्वारे विभागीय उपसंचालक व क्षेत्रीय अवयवदान प्रत्यारोपण समितीचे अधिकारी उपस्थित होते.



# लेखकांना विनंती

वाचकांचे मनोगत हे सदर लवकरच सुरु करीत आहोत,
तरी लेखांविषयी आपल्या प्रतिक्रिया व अभिप्राय ई-मेल आयडीवर अवश्य कळवावा.
**e-mail: ddhsiec.creatives@gmail.com**

- महाराष्ट्र आरोग्य पत्रिकेत आरोग्यासंबंधीच्या विषयांवर लेख, कविता,यशकथा इत्यादी साहित्य प्रकाशित केले जाते.
- साहित्य अप्रकाशित असावे. लेख मुख्य संपादक तथा उपसंचालक, आरोग्य सेवा (आय.ई.सी.ब्युरो) राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, परिवर्तन इमारत, आरोग्य भवन, विश्रांतवाडी पोलिस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे 411006 या पत्त्यावर पाठवावेत. लेखकांनी स्वतःचा पूर्ण पत्ता दूरध्वनी किंवा भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल आयडी लिहावा.
- केवळ पुस्तकी ज्ञानापेक्षा क्षेत्र अनुभवांवरील साहित्याला प्राधान्य देण्यात येते. फक्त मराठी भाषेतील मजकुर प्रसिद्ध होतो.
- लेख/साहित्य प्राप्त झाल्यावर निवड समितीच्या मान्यतेने साहित्याची निवड केली जाते. अस्वीकृत साहित्य परत पाठविणे शक्य होत नाही. आपले लेख कागदाच्या एका बाजूस सुवाच्च अक्षरात लिहून किंवा टंकलिखित करुन पाठवावेत. शब्द संख्या 700 ते 800 असावी.
- अपेक्षित महिन्यापूर्वी किमान दोन महिने अगोदर संबंधित लेख या कार्यालयास प्राप्त झाल्यास छपाईचे योग्य काम योग्य वेळेत पूर्ण होऊ शकते. पुढील 3 महिन्यांसाठीचे विषय पुढे दिले आहेत.

## आरोग्य पत्रिकेसाठी पुढील महिन्यांसाठीचे विषय

### सप्टेंबर २०२५

- **१ ते ३० सप्टेंबर** पोषाहार महिना
- **५ सप्टेंबर** राष्ट्रीय शिक्षक दिन व मज्जारज्जू दुखापत दिन
- **८ सप्टेंबर** जागतिक साक्षरता दिन
- **१० सप्टेंबर** जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन
- **१६ सप्टेंबर** जागतिक ओझोन दिन व जागतिक अस्थिमज्जा दाता दिन
- **२१ सप्टेंबर** क्षारसंजीवनी दिन
- **२५ सप्टेंबर** जागतिक औषधनिर्माता दिन
- **२८ सप्टेंबर** जागतिक रेबीज दिन
- **२९ सप्टेंबर** जागतिक हृदय दिन
- **सप्टेंबर** जागतिक कर्णबधिरता

### ऑक्टोबर २०२५

- **१ ऑक्टोबर** रक्तदान दिन व ज्येष्ठ नागरिक दिन व जागतिक शाकाहार दिन स्तनाचा कर्करोग जागरुकता महिना
- **२ ऑक्टोबर** स्वच्छता दिन व राष्ट्रीय व्यसनाधिनता प्रतिरोध दिन
- **७ ऑक्टोबर** जागतिक सेरेब्रल पाल्सी दिन
- **९ ऑक्टोबर** जागतिक दृष्टी दिन
- **१० ऑक्टोबर** मानसिक आरोग्य दिन
- **११ ऑक्टोबर** जागतिक बालिका दिन

### ऑक्टोबर २०२५

- **१२ ऑक्टोबर** जागतिक संधिवात दिन
- **१३ ऑक्टोबर** जागतिक थ्रोम्बोसीस दिन
- **१५ ऑक्टोबर** जागतिक हाताची स्वच्छता जागरुकता दिन
- **१६ ऑक्टोबर** जागतिक अन्न दिन व जागतिक बधिरीकरण दिन
- **१७ ऑक्टोबर** जागतिक आघात दिन
- **१८ ऑक्टोबर** जागतिक रजोनिवृत्ती दिन
- **२० ऑक्टोबर** जागतिक अस्थी विर्दीणता दिन
- **२१ ऑक्टोबर** जागतिक आयोडीन न्यूनता विकार नियंत्रण दिन
- **२४ ऑक्टोबर** जागतिक पोलिओ दिन
- **२६ ऑक्टोबर** जागतिक स्थूलता दिन
- **२९ ऑक्टोबर** जागतिक पक्षाघात दिन

### नोव्हेंबर २०२५

- **७ नोव्हेंबर** राष्ट्रीय कर्करोग जागरुकता दिन
- **१० नोव्हेंबर** जागतिक लसीकरण दिन
- **१२ नोव्हेंबर** जागतिक न्यूमोनिया दिन
- **१३ ते १९ नोव्हेंबर** जागतिक प्रतिजैविके जागरुकता सप्ताह
- **१४ नोव्हेंबर** बाल दिन व जागतिक मधुमेह दिन
- **१४ नोव्हेंबर** बाल दिन व जागतिक मधुमेह दिन
- **१५ ते २१ नोव्हेंबर** नवजात बालक काळजी सप्ताह
- **१७ नोव्हेंबर** राष्ट्रीय अपस्मार दिन
- **१९ नोव्हेंबर** जागतिक दीर्घकालीन श्वासावरोध विकार दिन व जागतिक शौचालय दिन

(या अंकातील सर्व मते लेखकांची असून त्यांच्याशी संपादक मंडळ व शासन सहमत असतीलच असे नाही. तसेच लेखातील विषयाबाबत अधिक माहितीसाठी कृपया लेखकांशी संपर्क साधावा)

**पत्र व्यवहारासाठी पत्ता**

मुख्य संपादक, महाराष्ट्र आरोग्य पत्रिका तथा उपसंचालक
आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग,
परिवर्तन, आरोग्य भवन परिसर, विश्रांतवाडी पोलीस
स्टेशन समोर, येरवडा,
पुणे 411006

# अवयव दाते आणि त्यांच्या कुटुंबियांचा सत्कार

















# अवयव दाते आणि त्यांच्या कुटुंबियांचा सत्कार















Registered
Maharashtra Arogya Patrika (Marathi)
**RNI No. MAHMAR/2000/1736**
The date of Publication is 24th August 2025

# ॥ गणपती बाप्पा मोरया ॥

## गणेशोत्सवाचा आनंद घेऊ या, पण आरोग्याला प्राधान्य देऊ या!

- सार्वजनिक ठिकाणी तंबाखू व तंबाखुजन्य पदार्थ खाऊन थुंकू नका
- मद्यपान टाळा, आरोग्य सांभाळा
- प्रसाद घेताना हात स्वच्छ धुवा
- उघड्यावरील पदार्थ खाणे टाळा
- गर्दीत ढकलाढकली करू नका, संयम ठेवा
- पिण्यासाठी नेहमी उकळलेले किंवा फिल्टर केलेले पाणीच वापरा
- पाणी साचू देऊ नका, डेंग्यू, मलेरियापासून सावध रहा
- ध्वनी प्रदूषण टाळा, आरोग्य जपा
- प्लास्टिक व थर्माकोलचा वापर टाळा, पर्यावरण व आरोग्य दोन्ही जपा
- आजाराची लक्षणे जाणवल्यास त्वरित जवळच्या आरोग्य केंद्रात तपासणी करा



Monthly Maharashtra Arogya Patrika is published by
Dr. Kailas B. Baviskar on behalf of Public Health Department, Government of Maharashtra at
Maharashtra State Health I.E.C. Bureau, Parivartan', Arogya Bhavan Compound, Opp. Vishrantwadi Police Station, Yerawada, Pune 411 006.